## प्रकरण चौथे

### 'पडझड' व 'घुसळा' या कादंबरीतील वाङ्मयीन अभिव्यक्ती :
### व्यक्तिचित्रणे, प्रसंगनिर्मिती, वातावरणनिर्मिती, निवेदनपध्दती, भाषाशैली.

# प्रकरण चौथे

# 'पडझड' व 'धुराळा' या कादंबरीतील वाङ्मयीन अभिव्यक्ती : व्यक्तिचित्रणे, प्रसंगनिर्मिती, वातावरणनिर्मिती, निवेदनपध्दती, भाषाशैली.

**प्रस्तावना**

प्रस्तुत प्रकरणामध्ये योगीराज वाघमारे यांच्या 'पडझड' व 'धुराळा' या कादंबरीतील वाङ्मयीन अभिव्यक्तीचा अभ्यास करणार आहोत. 'पडझड' व 'धुराळा' या वाङ्मयीन अभिव्यक्तीचा अभ्यास व्यक्तीचित्रणे, प्रसंगनिर्मिती, वातावरणनिर्मिती, निवेदनपद्धती, भाषाशैली इ. घटकांच्या अनुषंगाने पाहणार आहोत.

**व्यक्तिचित्रणे**

व्यक्तिचित्रण हा कथानकाइतकाच कादंबरीचा महत्त्वाचा घटक आहे. कथानकाला गतीमान करण्याचे काम व्यक्तीचित्रणे करीत असतात. व्यक्तिचित्रणाशिवाय कथानक अपूर्ण राहते. हाच कादंबरीचा मूलभूत घटक आहे. कुटुंब, समाज, निसर्ग यांच्याशी व्यक्तीचा सतत परस्पर संबंध येत असतो. त्यामुळे कादंबरीत व्यक्तीचित्रण हा घटक महत्त्वपूर्ण ठरतो. प्रभावी व्यक्तिचित्रण हा श्रेष्ठ कादंबरीचा मुख्य निकष असतो. कादंबरीतील व्यक्तिचित्रणे जितकी प्रभावी आणि जीवंत होतील तितकी कादंबरी यशस्वी होत असते. कादंबरीत आशयाचा आवाका मोठा असल्याने कादंबरीत मानवी जीवन व्यवहाराचे सविस्तर चित्रण करता येते. यासाठी उषाहस्तक याचे मत महत्त्वपूर्ण ठरते.

"वास्तव सृष्टीत व्यक्तीला जी परिमाणे असतात ती कादंबरीच्या सृष्टीतील 'व्यक्ती' लाही देता येतात. मग हे परिमाण तिच्या मनाचे असो, बुद्धीचे असो, काळाचे असो, समाजाचे असो, संस्कृतीचे असो, इतिहासाचे असो वा अन्य कोणत्याही अंगाचे

असो. 'व्यक्ती' ला असणाऱ्या अशा अनेकविध परिमाणांचा उपयोग करण्याची क्षमता केवळ कादंबरीतच असल्यामुळे मानवीजीवन व्यवहाराचे कोणतेही रूप ती मूर्त करू शकते."[१]

व्यक्तिचित्रणे रेखाटताना व्यक्तीच्या बाह्यांग आणि अंतरंग या दोन्ही गोष्टी विचारात घेतल्या पाहिजेत. व्यक्तिचित्रणात सुसंगती असणे अत्यंत महत्त्वाचे असते. व्यक्तिचित्रणे प्रभावी व परिणामकारक होण्यासाठी मनोविश्लेषणाचा वापर केला जातो. योगीराज वाघमारे यांच्या 'पडझड' व 'धुराळा' या कादंबऱ्यांचा सविस्तर अभ्यास करूया.

## 'पडझड' या कादंबरीतील व्यक्तिचित्रणे

### शिवरामतात्या

शिवरामतात्या भीमनगरमधील एक वयस्कर व्यक्ती आहेत. शिवरामतात्याचे संपूर्ण आयुष्य पाटलाच्या घरी काम करण्यात गेले. या कामामुळे तात्यांचा चेहरा पूर्णपणे रापलेला. हातापायांना घट्टे पडलेले असतात. एके दिवशी तात्या लाकूड फोडीत असताना, कुऱ्हाडीचा घाव चुकतो व तात्यांचा पायाच्या अगठांवर पडतो. अंगठा तुटतो, तात्याला दवाखान्यात नेतात. तात्यांच्या औषधपाण्याला पाटील पाच पन्नास रूपये देतात. त्यामुळे गावात पाटलाचे गुणगाण केले जाते. पण या कुटुंबाची खूप दूर्दशा होते. तात्यांची जखम बरी होण्यासाठी खूप प्रयत्न केले जातात. देवदेवर्षी केले जातात. पण त्यांचा काहीही उपयोग होत नाही. शेवटी ती जखम वाढत जाते व त्यातूनच उस्मानाबादच्या सरकारी दवाखान्यात त्यांचा पाय गुडघ्यातून काढला जातो. व तात्या कायमचे अपंग होतात. अशा या शिवरामतात्यांना आपल्या समाजातील लेखकाबद्दल खूप आस्था होती. लेखकानी खूप शिक्षण केले, पण त्यांना चांगली नोकरी मिळावी असे शिवराम तात्यांना वाटत होते. शिवरामतात्या हे अडाणी असले तरीसुद्धा त्यांना

नोकरीबद्दल त्याचे मत निराळे होते. लेखकानी शाळामास्तर, कारकून, तहसिलदार किंवा फौजदार या नोकऱ्या न करता वकिली करावी असे शिवराम तात्यांना वाटायचे. यातून शिवरामतात्यांचे विचार लेखकानी त्याची व्यक्तिरेखा रेखाटून नजरेस आणली आहे. व कादंबरीत एका दलित व्यक्तीची व्यथा प्रकट केली आहे.

**नागनाथतात्या**

शिवरामतात्याप्रमाणेच भीमनगरमधील एक वयस्कर व्यक्ती नागनाथतात्या आहेत. नागनाथतात्या तमाशात सोगांड्याचे काम करायचे. तात्यानी वालवडंच्या शिरपा महाराच्या तमाशात काम केले. तात्या हे जातीचे कलावंत होते. यांनी या तमाशाला खूप भरभराटी मिळवून दिली. तसेच या तमाशात घरातील अनेक सदस्य काम करीत. तात्यांना तमाशामध्ये 'बुरकुंडराव' या नावाने ओळखत. पण अशा या कलावंताची सवर्ण समाजातील लोक चेष्टा मस्करी करीत व 'बुरकुंड्या' म्हणून त्यांला चिडवित असे. त्यावेळी तात्यांना खूप राग येत असे. पण त्यांना तो राग व्यक्त करता येत नाही. ते लगेच म्हणायचे, "कोण हाय बे?"(पृ, १९) पण क्षणात त्या शब्दाबद्दल तमाशातली पोझ घेवून 'हूकूम महाराज!' असे म्हणून त्या लोकांना हसवायचे. कारण सवर्ण समाजातील लोकांना 'बे' म्हणायचे धाडस या दलितांना नव्हते. नागनाथतात्यांना अशा या लोकाबद्दल मनात खूप चीड होती. पण सवर्ण समाजाच्या ताकदीपुढे यांचे काही चालत नसे. या व्यक्तिरेखेतून सवर्ण समाजाचा दलित समाजावर कसा धाक होता याचा प्रत्यय आणणारी व्यक्तिरेखा म्हणून नागनाथतात्या कादंबरीत येतात. असे हे नागनाथतात्या ज्यावेळी लेखक गावी येतात त्यावेळी त्यांची आस्थेने विचारपूस करतात. तात्यांना आपल्या लोकाविषयी मनात खूप प्रेम असते. ते लेखकाना म्हणतात की, "'हा असंच येत जा. तुमाला बघून आमचा ऊर भरून येतोय.' (पृ. १९) इतका अभिमान तात्यांना आपल्या लोकाबद्दल होता याचे दर्शन या विधानातून नजरेस येतो. तसेच तात्या लेखकाना भेटल्यानंतर भावनाशील होतात. त्यांच्या डोळ्यातून पाणी येते. मन गहिवरून

येते. असे हे नागनाथतात्या खूप हळव्या मनाचे आहेत. त्यांच्या अंगी स्वजातीबद्दल, समाजातील लोकाबद्दल खूप निष्ठा असते. या निष्टेपोटीच तात्या लेखकाच्या घरातील व्यक्तीविषयी आत्मीयतेने विचारपूस करतात. व सगळे मिळून गावी या असे म्हणतात. नागनाथतात्या हे एक कलावंत व समाजप्रेमी म्हणून कादंबरीत प्रकर्षाने जाणवतात.

**मारूती मांग**

'पडझड' या कादंबरीत मारूती मांग ही व्यक्तीरेखा खूप महत्त्वपूर्ण आहे. दलित समाजातील लोकांची कशी बिकट अवस्था असते. त्यांना जीवनात कोणकोणत्या समस्यांना तोंड द्यावे लागते. यांचा प्रत्यय आणणारी व्यक्तिरेखा म्हणून मारूती मांग कादंबरीत अविष्कृत झाला आहे.

मारूती मांग हा दिसायला काळा, बुटका, मिशांचे आकडे असलेला धिप्पाड होता. असा हा मारूती हाफ पँन्ट अन् मळकं बनियन घालून तो गावातून फिरायचा. असा अवतार असलेला मारूती मांग होता. त्याला पाहताच तो कोणाशी तरी भांडूण आल्यासारखा वाटायचा. अशा या मारूतीची लोक खूप चेष्टा मस्करी करीत त्यावेळी मारूती मांग खूप चिडायचा व तो शिव्या देत असत.

मारूती मांगाने अनेक बायका केल्या होत्या. पण एकीबरोबर सुद्धा त्याचे जमले नाही. अशा या मारूतीला या बायकाबद्दल काहीच वाटत नसे. तो सहजच म्हणायचा "त्याचं काय? पहिली गेली पळून मग म्या काय करू? तवा हिला गाठलं. हिला बी सोडून दिलं होतं हिच्या नवऱ्यानं." (पृ. २१)

अशा या मारूतीच्या संसारात एकही बाई टिकली नाही, कारण नवीन बायको केल्यानंतर काही दिवस अगदी गोडी गुलाबीने ते राहत असत. मिळून-मिसळून काम करीत पण काही दिवसातच त्यांचे भांडण व्हायचे व बायको त्याला सोडून जात असे. अशा या मारूतीला संसारसुख फार कमी मिळाले. मारूती हा पडल ते काम करीत असे. मारूतीने गंवडी काम करणे, बँण्डवाल्याच्या संग डफ वाजविणे अशा प्रकारची कामे करणारा कष्टाळू स्वभावाचा मारूती नजरेस येतो.

जगण्यासाठी हालअपेष्टा करणारा मारूती मांगाला आपल्याला एखादे मूलबाळ असावे असे सतत वाटायचे. यामुळे त्यांनी अनेक बायका केल्या होत्या. पण एकटी बाई त्याच्याजवळ टिकू शकली नाही. त्यामुळे त्याला संततीसुख मिळाले नाही.

मारूती मांग हा काहीतरी कामधंदा करण्यासाठी अधून-मधून मुंबईला जात असे. तेथे तो कचराकुंडीतील कागद, कापड, प्लस्टिक वस्तू, काचा गोळा करीत व घाटकोपरला जावून विकत असे व त्या पैशावरती तो आपला उदर-निर्वाह चालवित असे. एके दिवशी मारूती मांगाच्या आयुष्यात एक लाभदायक घटना घडते. कचरा गोळा करीत असताना त्याला सोन्याची दहा बिस्किटे कचराकुंडीत सापडतात. तो खूप आनंदी होतो. पण त्याला थोडीशी भीतीही वाटू लागते. त्याच एक मन म्हणायचं, "'लेका टाकून दे, दुसऱ्यांच धन हाय. तर दुसर मनं म्हणायच, इथं कशाला राहतोस? गावाकड पळ शेत घे, घर बांध, कपडे घे, धान्य घे, पळ." अशी अवस्था मारूती मांगाची व्हायची.

शेवटी तो सोने घेवून तो गावी येतो. अगदी रूबाबात गावातून फिरत असतो. त्याला पोलिसाची भीती वाटत असते. तरीसुद्धा त्या भीतीला न जुमानता तो चांगली कपडे, रोज दाढी करून तो अगदी ऐटीत राहत असतो.

एके दिवशी तो गावातून फिरत असताना त्याच्यासमोर पोलिस पाटील येतात. तेव्हा मारूतीला पोलिस पाटलाची खूप भीती वाटते. त्या भीतीतून त्यांच्या मनात गैरसमज निर्माण होतो व तो पाटलाच्या जाळ्यात सापडतो. मारूतीच्या या प्रकाराबद्दल काहीही माहिती नसलेला पाटील फक्त मोठ्या आवाजात इतकेच म्हणतो की, "काय मारत्या, ऐकतो ते खरं हाय का?" (पृ. २५) इतक्या शब्दाला घाबरून तो सर्व सांगायचो ठरवतो, नाहीतर पाटील पोलिसांना सांगतील व मला बेड्या ठोकतील. या भीतीपोटी तो पाटलाच्या वाड्यावर जातो व झालेला प्रकार पाटलाला सांगतो व सोन्याची बिस्किटे पोलिस पाटलाच्या हवाली करतो व तो घरी येतो. सोन्याची बिस्किटे

दिल्यामुळे त्याला बरे वाटत असते पण एखाद्यावेळी वाटायचे की, "पाटलांच चांगल व्हायचं नाय." यातून मारूतीची पाटलाबद्दल असणारी चीड व्यक्त होते. मारूतीला या प्रकाराबद्दल खूप वाईट वाटत होते. या सोन्यावरती पाटील श्रीमंत झालेला असतो, पण पोलिसाच्या भीतीपोटी मारूती हा प्रकार कुणाला सांगत नाही.

एके दिवशी पाटलांचा अपघाती मुत्यू होतो. त्यावेळी मारूती मांगाला खूप आनंद झाला. त्या दिवशी तो खूप हसतो, लोळतो. यातून पाटलाबद्दल असलेला राग कितीतरी दिवस मनात असतो हे यातून नजरेस येते. दलित समाजातील व्यक्तीचे सवर्ण समाजाकडून कसे शोषण केले जाते याचे दर्शन होते.

**किसना मांग**

प्रामाणिकपणे काम करणाऱ्या दलित मजूराच्या आयुष्याची कशी वाताहात होते. यांचे दाहक चित्रण किसन मांग या व्यक्तिरेखेतून 'पडझड' कादंबरीत येते.

किसना मांग हा प्रामाणिक मजूर आहे. किसना मांगाचे वय तीस बत्तीस वर्षे आहे. तो थोरल्या पाटलाच्या शेतात कामाला असतो. पाटलाच्या शेतातील कोणतीही कामे तो आनंदाने करीत असे. पाटलाची सेवा करणे हाच आपल्या जीवनाचा अर्थ आहे असे किसनाला वाटत असते. किसना हा खूप कष्टाळू असतो. तो ऊन, वारा, पाऊस याची काळची न करता सतत कामात मग्न असे. पाटलानी किसनाला काहीही बोलले तरी किसनाला त्याचा राग यायचा नाही. उलट पाटलाना बघताच तो वाकून नमस्कार करीत असतो. इतक्या प्रामाणिकपणे किसना मांग काम करीत असतो. किसना मांगाला वाटायचे की पाटलाची शेती पिकली म्हणजे दिवसकाळ चांगले येतील असा विचार करीत असतो. असा प्रामाणिक व समाधानी किसना असतो. किसनाने आपल्या बायकोलासुद्धा पाटलाच्या वाड्यावर कामाला लावले होते. तिलासुद्धा पाटलाच्या तो प्रामाणिकपणे काम कर असा सूचवणारा किसना असतो. धुरपा ही पाटलाच्या वाड्यावरील बरीच कामे ती आनंदाने करीत असे. अशा सतत काम करणाऱ्या

किसनाची आशा मात्र साधी होती. तो पाटलानी दिलेल्या शिळ्या तुकड्यावर आनंदाने राही. किसना मांग व त्याची बायको धुरपा ही पाटलाच्या शेतात सुखाने राहत होते. किसना हा कामाला खूप चांगला होता. त्यामुळे पाटीलही त्याच्यावर खुश होता, पण हा आनंद काही दिवसापुरताच राहिला. नियतीने किसना मांगाच्या आयुष्यात सुख कमी दु:ख जास्त दिले. पाटलाच्या शेतामध्ये गुऱ्हाळ काढले जात असे. अशा गुऱ्हाळात जाळ लावण्याचे काम किसन करायचा. त्याचबरोबर अनेक व्यक्तीही या ठिकाणी कामाला होत्या. प्रत्येकाचे काम वेगवेगळे होते. असा हा गुऱ्हाळा महिना-दीड महिना चालत असे. नावाजलेले गुळवे येथे कामाला असायचे. अशा या गुऱ्हाळाला जाळं घालताना किसनाला खूप धावपळ करावी लागत असे. दिवसातून दोन-तीन आधणं घेतली जायची. त्यामुळे त्याला सतत चुलाण्यासमोर राहावे लागत असे. किसनाचे या कामामुळे हातपाय काळे पडलेले असतात. तसेच धुरामुळे त्याला गुदमरत असे. पण इतके अतोनात परिश्रम घेवून ही किसनाची अपेक्षा फकत अर्धा गुळाची ढेप व ढिचकीभर रस इतकी असे.

एके दिवशी किसना मांगाच्या जीवनात एक वाईट घटना घडली. सततच्या धावपळीच्या कामामुळे व नाकातोंडात जाणाऱ्या धुरामुळे तो दमून गेलेला असतो. अशा अवस्थेत तो गुऱ्हाळ्याला जाळ घालण्यास जातो व तो हेलपाटत चुलाण्याच्या तोंडाशी अडकतो. यामुळे किसनाच्या अंगाला आग लागते. किसना 'मेलो ग मायऽऽ वाचवा!' असे म्हणून ओरडतो. त्याचवेळी तेथे काम करणारे कामगार धावून येतात व किसनाला त्या आगीपासून वाचवतात. किसना खूप तळमळत असतो. त्याचे शरीर भाजून गेले असते. या दुर्घटनेत किसनाचा उजवा हात व पाय पूर्णपणे जळालेला असतो. अशा जखमी अवस्थेत त्याला बार्शीच्या दवाखान्यात उपचारासाठी नेले जाते. किसनाबद्दल सर्व गाव हळहळत होते. या दुर्घटनेतून किसना वाचला होता. पण त्याचे निम्मे शरीर जळल्यामुळे त्याला काही काम करता येत नव्हते. एकेकाळी धावून-पळून कामे

करणाऱ्या किसनाला या दुर्घटनेमुळे आता काठीचा आधार घ्यावा लागत होता. किसनाला पाटलाबद्दल मनात खूप निष्ठा असते. पाटलानी त्याला वाचविलेले असते. एके दिवशी किसना मांग पाटलाच्या वाड्यावर जातो व मालकाचे आभार मानतो तो पाटलाला म्हणतो, ''मालक, तुमी व्हताव म्हून म्या वाचलो, लय उपकार झालेत!'' (पृ. ४६) पण त्याच्या बोलण्याकडे पाटील दुर्लक्ष करतो. माझ्या बदल्यात धुरपाला कामावर लावून देतो असे किसना म्हणतो, पण मालकाला किसनाच्या या अवस्थेविषयी जरासुद्धा कीव न येता उलट झालेल्या नुकसानीचे व दवाखान्याच्या खर्चाचे काढतो व त्याला येथून जाण्यास सांगतो. याबद्दल किसनाला खूप वाईट वाटते व तो पाटलाकडे लाचाराप्रमाणे बोलण्यानंतर निष्क्रिय व प्रामाणिक असलेला, पण परिस्थितीपुढे लाचार झालेला किसना गाव सोडतो. समाजामध्ये एक शोषित व्यक्तीरेखा म्हणून किसना हा कादंबरीत निर्देशनात येतो. मारूती मांग व्यक्तिरेखेमुळे 'पडझड' ही कादंबरी महत्त्वपूर्ण ठरते.

**शेटीबादादा**

शेटीबादादा या व्यक्तिचित्रणातून एका भारतीय सैनिकाच्या दु:खाचे चित्रण कादंबरीत येते.

दलित समाजातील शेटीबादादा व्यक्तिरेखा ही प्रभावी व दर्जेदार आहे. शेटीबादादा हे भीमनगरात सर्वात उंच व ज्ञानी व्यक्ती असतात. भारतीय सैन्यात असताना त्यांनी दुसऱ्या महायुद्धात भाग घेतला होता. असा हा शेटीबादादा सैन्यातील नोकरी पार पाडून गावी येतो. शेटीबादादांना सैनिकातील नोकरीबद्दल गर्व होता. शेटीबादादा अंगावर मिलिटरी शर्ट घालायचे, त्यावर पितळी बिल्ला लावत असे व कॅनव्हासचा बूट घालून ते सैनिकी पोषाखात चावडीत बसत. शेटीबादादांना आपल्या सैनिकीकाळात घडलेल्या घटना, युद्धकथा सांगायला खूप आवडत असे. व त्या कथा ऐकायला ही लोकांना चांगले वाटायचे.

शेटीबादादाच्या अंगी सैन्यातील शिस्त अगदी परिपूर्णरित्या भिणली होती. ज्यावेळी लोक कथा ऐकण्यासाठी चावडीत येत त्यावेळी त्यांना नीट बसायला सांगून 'अटेन्शन!' असा हूकूम सोडायचे. यातून दादांच्या शिस्तीचा प्रत्यय येतो.

शेटीबादादा कहानी सांगत असताना युद्धकाळातील स्थिती लोकाच्यांपुढे प्रत्यक्ष उभी राहत असे. युद्धात घडलेल्या घटना, युद्धप्रसंग याची सखोल माहिती ते लोकांना सांगत. तेथील लोकही त्यात समरस होवून ऐकत असत. शेटीबादादांना सिगारेटचे फार व्यसन होते. सिगारेट घेतल्याशिवाय ते गोष्टी सांगत नसत. चावडीत त्यांच्या गोष्टी ऐकण्यासाठी लोक कामधंदा सोडून येवून बसत. यामुळे तेथील बायका सतत ओरडायच्या "तुजं काय गठूडं असतंय, जवा बघावं तवा चावडीतच असतोस? त्या शेटीबाला एक काम नाय. तुला काम हाय नव्ह?" (पृ. ३०) यातून तेथील समाजात शेटीबादादाला बिनकामाचा म्हणून बायका हिणवत असत. याचे दर्शन यातून घडते. शेटीबादादाच्यांकडे एक मनोरंजन म्हणून लोक पाहत असत.

शेटीबादादानी सैन्यातून निवृत्त झाल्यानंतर काही दिवस मजेत घालविले. कोणताही कामधंदा न करता निवांत राहायचे. चावडीत बसणे, गोष्टी सांगणे, पेपर वाचणे असा त्यांचा दिनक्रम होता. पण त्यांच्या या वागण्यामुळे त्यांच्या घरच्या परिस्थितीवर फार वाईट परिणाम होतो. घरामध्ये अनेक अडचणी निर्माण होतात. शेटीबादादांची मुले शाळा शिकत होती व दादाचा एक डोळा सीमेवर असताना निकामी झाला होता. त्यामुळे त्यांना कोणत्याही प्रकारचा कामधंदा होईना. शेटीबादादाची पत्नी कामाला जात असे पण तिच्या एकटीच्या पगारावरती घर चालू शकत नव्हते. यामुळे दादाच्या घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची झाली. शेवटी दादाना अंगावरील उलनचा कोट विकावा लागला व त्यावरील पितळी बिल्ला मनाच्या इच्छेविरूद्ध परिस्थितीमुळे काढून टाकावा लागतो. शेटीबादादाना डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्याबद्दल खूप अभिमान होता. या अभिमानापोटीच ते आंबेडकर जयंतीत तो उलनचा कोट घालून तुरा

असलेली टोपी घालून फिरत असत व अगदी ताठ मानेने झेंड्याला वंदन करायचे. अशा या दादांची उतारवयात खूप दुर्दशा होते. तरूणपणात सिगारेट व्यसन खूप झाल्यामुळे त्यांना दमा झालेला असतो. दम्यामुळे ते खंगलेले असतात. अशा या दादाची मुले मोठी होवूनही दादाकडे दुर्लक्ष करीत असतात. त्यांच्या मुलांचे म्हणणे असे असते की, ''आम्हाला काय मिळवून दिलयं? इतर गावच्या माजी सैनिकाना जमिनी मिळाल्या. पण आम्हाला कुठंय? तेव्हा म्हाताऱ्याला पोसून करायचं काय?'' (पृ. ३१) त्यातून त्यांच्या मुलांचे शेटीबादादाकडे बघायचा दृष्टिकोन नजरेस येतो. आयुष्यभर देशसेवा करणारा भारतीय सैनिक शेटीबादादा हा उतारवयात समाजाच्या व घरचांच्या नजरेत हीन ठरलेला असतो. शेवटी दम्याच्या आजारपणातच त्यांचा खोकून खोकून एका पावसाळ्यात बसल्या ठिकाणीच मृत्यू होतो. बर्मात लढलेल्या या शूर सैनिकाचा मृत्यू इतक्या वाईट पद्धतीने होतो. शेटीबादादा या व्यक्तिरेखेतून भारतीय सैन्यातील सैनिकाची झालेली दुर्दशा, तसेच शेटीबादादांना भारतीय सैनिकाबद्दल, आंबेडकराच्यांबद्दल असणाऱ्या अभिमानाची प्रचिती या व्यक्तिरेखेतून नजरेस येते.

**नाना**

भीमनगरमधील एक कष्टाळू व्यक्ती म्हणून नानाचा उल्लेख कादंबरीत झाला आहे. नानाच्या व्यक्तिरेखेतून लेखकानी एका समस्येचा उलगडा केला आहे.

नाना खूप कष्टाळू स्वभावाचे असतात. रानोमाळ फिरून रोज शेण गोळा करणे हा त्यांचा दिनक्रम होता. त्यासाठी ते पहाटे लवकर उठून पाणवठ्याच्या जागी तळ्याकाठी जावून एक-दोन पाट्या शेण आणल्याशिवाय ते तोंड धूत नसत. पण नानाच्या या दिनक्रमामुळे तेथील इतर लोकांना जळणासाठी लागणाऱ्या गोवऱ्या मिळणे अवघड झाले होते. नाना शेण गोळा करून भलामोठा उकिरडा तयार केला होता. त्या उकिरड्यावर पंधरा वीस गाड्या शेणखत व्हायचे. नानाला या खताबद्दल भरपूर मोबदला मिळायचा. अशा शेणखताच्या पैशातून नानांनी थोरल्या मुलींचे लग्न करतात. नानाच्या

घरी गुरढोरं नसतानाही नाना जी मेहनत करून भलामोठा उकिरडा तयार केलेला असतो. त्या काळचे लोक व त्या काळातील कामाचे स्वरूप व आपले उदरनिर्वाहचे साधन म्हणून कोणत्या प्रकारची कामे करत होती याचे दर्शन नानाच्या व्यक्तिरेखेतून निर्देशनास येते.

नानानी खूप कष्ट करून संसाराचा गाडा ओढला, पण नानाच्या उतारवयात मात्र शेणासाठी फिरणे, माळरान भटकणे हे काम जमत नव्हते. त्यामुळे तो उकिरडा ओस पडतो. नानाचे आपल्या मुलीवर खूप प्रेम असते. या प्रेमापोटीच नानानी सरूचे लग्न अगदी थाटामाटात करून दिले होते, पण सरूच्या नवऱ्याने भांडण करून सरूला नानाकडे आणून सोडलेले असते. त्यामुळे नानाला सरूची खूप काळजी वाटत असे. निष्क्रिय वयस्कर झालेले नाना खूप थकले असतात. त्यांच्या या परिस्थितीमुळे ते खूप दुःखी होतात. "व्हय मांझ्याच नशिबी अस का?" (पृ. ३३) असे नाना म्हणत असत. यातून नानाच्या मानसिक स्थितीचे दर्शन नजरेस येते.

सरूला सासरी सोडवण्यासाठी नानांनी खूप प्रयत्न केले, पण तिचा पती तिला नांदवायला तयार नसतो. नानांनी त्यातूनसुद्धा एक मार्ग काढला व काही मध्यस्थींना घेवून ते सरूच्या सासरी जातात. पण सरूचा पती काही केल्या तिला नांदवण्यास नकार देतो. त्यावेळी मात्र नाना खूप संतापतात व म्हणतात, "पावणं, माज्या पोरीला काय बट्टा हाय का ते दाखवा. तरच घरात घेईन. नायतर तूमी तिला आड दाकवा अगर हीर दाकवा." (पृ. ३३) यातून नानाचा स्वाभिमानपणा, संस्कारीपणा स्पष्टपणा प्रत्ययास येतो. शेवटी मध्यस्थी सांगतात, "पोरीला राहू द्या माहेरात चार-आठ दिस. कुणाचाबी राग काय राहत नाही लय दिस" (पृ. ३३) यामुळे ती घरीच राहते नंतर तिच्याकडे दुर्लक्ष होते. नानाचेही काही चालत नाही. नानाच्या व्यक्तिरेखेतून लाचार बापाची कशी अवस्था होते व त्यास समाज कसा कारणीभूत आहे याचा प्रत्यय येतो.

**सरू**

'पडझड' या कादंबरीत जी स्त्रीचित्रणे आली आहेत त्यात सरूची व्यक्तिरेखा महत्त्वपूर्ण ठरते. दलित समाजातील स्त्रीला समाजातील कोणकोणत्या पातळीवरती संघर्ष करावा लागतो व तिचे कसे शोषण केले जाते याचा प्रत्यय आणणारी सरू ही व्यक्तिरेखा कादंबरीत येते.

सरू ही नानाची मुलगी आहे. अत्यंत गरीब कुंटूबात तिचा जन्म झाला होता. सरूचे वडील नाना हे शेण गोळा करून त्या उकिरड्याच्या खतावरती सरूचे लग्न करतात. सरू ही सासरी नांदायला जाताना सर्वांच्या गळा पडून तिने निरोप घेतला. अशा या प्रेमळ सरूच्या आयुष्यात मात्र सांसारिक सुख फार काळ मिळत नाही.

सरूचे लग्न भालेराव मास्तरानी जमवून दिलेले असते. सरू ही खूप हुशार व संस्कारी मुलगी असते. सरूचा स्वभाव रागीट असतो. तिला चुकीचे प्रकार आवडत नसते. लग्नानंतर काही दिवसातच तिला समजते की तिचा पती हा चुलतीबरोबर आहे. यामुळे सरू व तिचा पती यांच्यात सतत भांडण होत असे. या पती पत्नीच्या आयुष्यात चुलतीद्वारे विघ्ने आणली जातात. सरूला ती सतत अपमानास्पद वागणूक देत असे. ''पंधरा एकर जमीनवाला मिळाला पर त्यांच्या जोगता मान नतूक नाय. फुकटात नवरा गवसला.'' (पृ. ३४,३५) अशी चुलती बोलत असते. सरूचा सासरी खूप छळ होत असतो. या प्रकाराबद्दल माहेरी सांगूनही काही उपयोग होत नव्हता. एखादे मूलबाळ झाले की त्रास कमी होईल या विचाराने ती गप्प असतात. पण सासर व माहेर यांच्यामध्ये सरूचे हाल होत असते. सरूच्या माध्यमातून स्त्रीयांच्या लाचारीचे व स्त्रियावर होणाऱ्या अत्याचाराचे दर्शन लेखकानी प्रभावीपणाने वाचकासमोर मांडतात. त्यामुळे कादंबरी वाचनीय बनते. स्त्री जीवनाची व्यथा मांडण्याचा प्रयत्न येथे लेखकानी केला आहे. सरू ही जिद्दी स्वभावाची आहे. अशा बिकट परिस्थितीतसुद्धा ती खंबीर मनाने सासरी राहत असते. तेथील छळ सहन करीत असते. यातून सरूचा संयमशील,

निर्भिडपणा नजरेस येतो. एके दिवशी सरूच्या नवऱ्याने सरूशी भांडण काढले व तिला घरातून निघायला सांगितले. त्यावेळी निर्भिड अशा करारी सरू नवऱ्यास म्हणाली की, "म्या कशी निगत? दहाजनासमक्ष लगीन केलंय." (पृ. ३५) सरूचा हा धाडशीपणा स्त्रियांना प्रोत्साहित करणारा ठरतो. आपल्यावर होणाऱ्या अन्यायाविरूद्ध टक्कर देणारी सरू ही कादंबरीत महत्त्वपूर्ण ठरते.

पुरूषप्रधान समाजात स्त्रीयांच्याकडे कोणत्या दृष्टिकोनातून समाज बघतो याचा विचार करायला लावणारी ही व्यक्तिरेखा एक खूप मोठा प्रश्न समाजासमोर ठेवते. शेवटी काही लोकाच्याबरोबर सरूला माहेरात आणून सोडले जाते. तिच्या माहेरातील काही मंडळी तिच्या पतीला समजावून सांगतात पण तिचा पती काही केल्या सरूला नांदवायला तयार नसतो. तिच्या पतीचा राग कमी होईपर्यंत ती माहेरातच राहू दे असा सल्ला मध्यस्थाकरवी दिला जातो. पण सरू कायमची माहेरातच राहते. अशा पद्धतीने सरूच्या जीवनाची दुर्दशा झाली असते.

सरूच्या घरी एके दिवशी लेखक येतात. त्यांना चहा करून देत असताना तिचा पदर जळतो, पण तिला त्याचे विशेष काही वाटत नाही. ती पदराला लागलेला जाळ विझवते. पण तिच्या आयुष्याला लागलेला जाळ हा न विझवण्यासारखा होता. तिला जीवाची पर्वा नव्हती. जगण्याबद्दलची आशा संपली होती. सरूला तिच्या पतीने सोडल्यामुळे ती घाबरून जात नाही. सरूवर झालेल्या अन्यायामुळे ती खचली होती, पण ती परिस्थितीशी टक्कर देत होती. सरू म्हणायची की, "राहीन बीन नवऱ्याची, जवर मायबाप सांबाळतील तवर त्यांच्यात राहीन. ज्या दिवशी त्यानलाबी जड वाटल तवा म्या माजं कायबी करून घेईन, पण तुमा कुणाच्या नावाला बट्टा लावणार नाय." (पृ. ३६) अबला असल्याचा प्रत्यय सरू या व्यक्तिरेखेतून नजरेस येतो. लेखकानी पुरूषी व्यक्तिरेखाबरोबरच स्त्री व्यक्तिरेखा सुद्धा प्रभावीपणाने मांडलेली आहे व कादंबरी वाचनीय केली आहे.

## एस. आर. पी. चा जवान

समाजातील काही व्यक्ती खोटी माहिती सांगून आपला स्वार्थ कसा साधतात याची प्रचिती देणारी व्यक्तिरेखा म्हणून एस. आर. पी. ची व्यक्तिरेखा कादंबरीत येते.

बाजीरावच्या घरी खूप सुंदर मुली आहेत. त्या मुली पाहण्यासाठी उंच, गोरापान, अंगावर खाकी ड्रेस, पायात कॅनव्हासचे बूट अशा पोशाखात तो बाजीरावच्या घरी येतो. हा जवान एकटाच आलेला असतो. तो म्हणतो, ''म्या एस. आर. पी. त असतोय, सुटीवर आलोय, सुटीत मला लगीन करायचं.'' (पृ. ४५२) यातून जवानाचा स्पष्टपणा नजरेस येतो. पण या स्थळाबद्दल घरातील काही व्यक्ती विरोध करीत असतात, पण ग्रामीण भागातील लोक त्याच्या रूबाबाला भाळतात. बाजीला हे स्थळ आवडते. पण तो एकटाच आल्यामुळे बाजीच्या घरच्या लोकाच्या मनात शंका येत असते. त्यावेळी जवान त्यांना समजावून सांगतो, ''मला सुटी थोड्याच दिसाची हाय. म्या पोरगी पसंत केली की माज नातलग येतील नव्हं?'' (पृ. ४३) यामुळे त्यांच्या बोलण्यावर सर्वजण विश्वास ठेवतात. त्या जवानाकडून इतर माहितीही घेतात, तसेच तो कामावरील कार्ड दाखवतो व सर्वांना विश्वासात घेतो. यामुळे घरातील सर्व लोक या लग्नाला मंजुरी देतात. अशा या जवानाला पाहून गावातील लोकसुद्धा आश्चर्यचकित होऊन आनंदाने सांगायचे की, ''आमच्या लोभीला बघायला आलेत, एस. आर. पी.त हायेत म्हणं!'' (पृ. ४३) अशा या जवानाला लोभी पसंत पडते व लोभीच्या घरातील सर्वांना तो पसंत पडतो. लोभीचे व जवानाचे लग्न होते. या लग्नाबद्दल सर्व लोक स्तुती करीत असतात. बाजीचे व लोभीचे गुणगाण करीत असतात. पण हा आनंद फार काळ टिकत नाही कारण लोभी नांदायला गेली असताना काही दिवसातच आपल्या नवऱ्याबरोबर गावी येते, पण हा प्रकार गावातील लोकांना समजत नाही. तो जवान सर्वांची माफी मागतो, चुकलो म्हणतो व जे काही सत्य आहे ते सांगतो, ''मला संस्पेंड केलेलं हाय. माजं लगीत होत नव्हतं म्हणून तुम्हाला खोटचं सांगितल. आता मला मारा

अगर जीवे ठेवा. म्या तुमच्या दारात कुत्र्यावाणी पडून राहीन.'' (पृ. ४३) यातून त्या जवानाची फसवेगिरी समोर येते. लग्न होत नाही म्हणून खोटे बोलून स्वार्थ साधणारा हा जवान यांची व्यक्तिरेखा ही कादंबरीत एक वेगळाच ठसा उमटून जाते.

**अनुसया**

दोन बहिणीच्या खूप दिवसाच्या गाठीभेटीच्या प्रसंगातून नजरेस येणारी अनुसया ही व्यक्तिरेखा कादंबरीत चित्रित झाली आहे. अनुसया ही व्यक्तिरेखा लेखकाची मावशी आहे. अनुसया ही लहान असताना तिचे आई-वडिल वारलेले असतात. त्यामुळे ती लहानपणापासून लेखकाच्या घरीच राहत असते. एके दिवशी अनुसया ही सकाळी दूध घालण्यासाठी मुस्लिम वस्तीत गेली होती. त्यावेळी तिचे वय चार वर्षे होते. त्याचवेळी रझाकारानी मुस्लीम वस्तीवर हल्ला चढविला. अचानक झालेल्या हल्ल्यामुळे सर्व लोक भयभीत होवून सैरावैरा पळू लागले. रझाकारानी तेथील लोकांना मारण्यास सुरूवात केली. गोळीबार केला, त्यामुळे तेथील प्रत्येक व्यक्ती जीवाच्या भीतीने दिशा मिळेल तेथे धावू लागली. त्यामध्ये दूध घालण्यासाठी गेलेली अनुसया ही हरविली जाते. त्यावेळी अनुसयाला शोधण्यासाठी घरची लोक जातात. पण ती कुठे सापडत नाही.

अनुसया ही त्यावेळी घाबरून चिच्याच्या माणसाबरोबर पळत जाते. तिला घरचा रस्ता आठवत नाही. शेवटी एका गाडीत बसून ती त्या लोकांबरोबर जाते. तिला एका नदीवर सोडले जाते. तेथून तिला एका कुटुंबात आश्रय मिळतो. तेथीलच एका व्यक्तीबरोबर तिचे लग्न झालेले असते. अनुसयाला जेव्हा आपल्या गावाकडील आठवण येवू लागते तेव्हा ती आपल्या पतीबरोबर आपल्या गावी येते. लहानपणी हरवलेली अनुसया जेव्हा वीस वर्षांनी गावात येते, त्यावेळी अनुसयाच्या बहिणीला जेव्हा ही बातमी समजते, तेव्हा ती खूप भारावून जाते व त्या कडकडून भेटतात. अनुसयाला आपली माणसे भेटलेली असतात व खूप दिवसानी अनुसयाला आपले माहेर मिळाले असते.

**भीवदादा**

भीवदादा ही व्यक्तिरेखा समाजातील एक ज्वलंत समस्या घेवून कादंबरीत चित्रित झाली आहे. त्यामुळे कादंबरी वाचनीय ठरली आहे.

भीवदादा हा गावातील एक प्रतिष्ठित व्यक्ती असते. भीवदादा भीमनगरमध्ये राहत असतो. भीवदादाला सर्वजण परिचीत होते. त्यांना सर्वजन दादा म्हणून बोलावित असे. भीवदादा हे रेल्वेखात्यात गॅगमन म्हणून काम करीत होते. भीवदादाच्या घरची परिस्थिती बऱ्यापैकी होती. भीवदादा गावातील एक समजूतदार व्यक्ती होती. भीवदादाचा एक भलामोठा वाडा असतो. अशा वाड्यात भीवदादा व त्यांची पत्नी शांताआक्का अगदी सुखाने राहत असतात. भीवदादानी म्हशी, शेळ्या, गाई अशा प्रकारची जनावरे पाळली होती. खूप कष्टाळू स्वभावाचे भीवदादा असतात. भीवदादाचा पोशाख हा खूप सुंदर वाटत असे. डोक्याला लाल रूमाल, गळ्यात अर्ध्या तोळ्याचा बदाम, काळा दोरा, लालसर धोतर, चपला, भरदार मिशा व सतत पान खाणे यामुळे भीवदादाचे व्यक्तिमत्त्व गावात उठून दिसत असे.

भीवदादाचे आपल्या बायकोवर खूप प्रेम असते. तो बायकोला कधी घराच्या बाहेर लावून दिला नाही. असा हा प्रेमळ, सर्वांची मने जिंकणारा भीवदादा हा एका गोष्टीमुळे खचून गेलेला असतो. तो नाराज असतो. लग्न होवून खूप वर्षे झाली तरी दादाला मुलबाळ होत नव्हते. तरीसुद्धा सहनशील असणाऱ्या भीवदादाने कधी या गोष्टीकडे इतक्या गांभीर्याने पाहिले नाही. तरीसुद्धा तो आशावादी होता. दादाची पत्नी या गोष्टीबद्दल नाराज झाली की दादा तिची समजूत काढून म्हणत असे, ''अगं व्हईल कधी ना कधी!'' (पृ. ६२) असा आशावादी समजूतदार भीवदादा असतो.

भीवदादाला आपल्या नात्यातील मुलाबाळाबद्दल मनात प्रेम असते. या प्रेमापोटीच तो चुलत भावाच्या पोराला आपल्या मुलाप्रमाणे सांभाळत असे, ''हा है की मला सांबाळायला.'' (पृ. ६२) असे उद्गार तो त्या मुलाबद्दल काढत असे व

आपल्या बायकोला धीर देत असे. यामुळेच त्यांच्या सुखी संसारात असणारी उणीव, निराशा दादा दूर करण्याचा प्रयत्न करीत असे. भीवदादा यांनी कधीही कोणत्याही गोष्टीचे गांभीर्य घेतले नाही. ते निष्काळजी राहतात. भीवदादा हे मनाने खुप भोळे व तसेच दिलदार स्वभावाचे असतात. याच स्वभावाचा फायदा त्याचे मित्र घेत असत. आपल्या मित्रासाठी भीवदादा खूप पैसा खर्च करीत असे. दर आठवड्याला दारू, मटण, पानसुपारी, बिड्या अशाप्रकारच्या वस्तू आणून मौजमजा करीत असे व भीवदादा ही यात समरस होवून खूप दारू पित असे. दारूच्या नशेत दादा आपल्या अंत:करणातील भावनांना वाट करून देत असे. ''माणसांन जन्माला येऊन खाव, प्याव, मजा करावी. एका दिवशी मरायचंय तर मागं कुणाला ठिवायचं? मला तर काय कोन बी नाय. कुणासाठी ठेवू?'' (पृ. ६३) भीवदादाला मूलबाळ नसल्यामुळे त्यांच्या या विधानातून त्यांच्या दु:खाचे दर्शन घडते.

दादाच्या या रोजच्या नशेमुळे पती-पत्नीत सतत वाद होत असे. या भांडणाचे रूपातंर मारहाणीत होत असे. दादा शांताआक्काला शिवीगाळसुद्धा करीत असे.

एके दिवशी भीवदादानी दारू जास्त घेतली होती. त्यावेळी शांताआक्का व भीवदादा यांच्यात वाद झाला. या वादामुळे भीवदादाला खूप राग आला व त्या रागाच्या भरात भीवदादा छप्पराचं दांडक उपसतात व आक्काला मारायला सुरूवात करतात. आक्काला हा मार सहन होत नाही व आक्का जागीच मूत्यू पावते. दादाच्या हातून शांताआक्काचा खून होतो. पण काही क्षणातच दादाचा राग शांत होतो. दादा शुद्धीवर येतात. त्यावेळी आक्काला मारल्याचा खूप पश्चाताप दादाला होतो. भीवदादा 'माजे शांतेऽऽ' म्हणून रडू लागतात. यातून दादाच्या मनात शांताआक्काबद्दल असणाऱ्या प्रेमाचे दर्शन घडते. शांताआक्काच्या खूनाबद्दल भीवदादाला पोलिस पकडून नेतात. आपल्या चुलत्याकडून भीवदादाला मदतीची अपेक्षा असते. शेवटी भीवदादाला जन्मठेप होते.

अशा पद्धतीने भीवदादाचे आयुष्य उध्वस्त होते. यास जबाबदार आजची समाजव्यवस्था ठरते व भीवदादासारखा प्रेमळ, संयमशील, मायाळू अशा व्यक्तीचा राक्षस बनतो. याचे दर्शन या व्यक्तिरेखेतून कादंबरीत निर्दशनास येते.

**शांताआक्का**

पुरूषप्रधान संस्कृतीकडून स्त्रियांचे कसे शोषण केले जाते व स्त्रियांचा कसा बळी घेतला जातो व स्त्रियांचे समाजातील स्थान या सर्व गोष्टीचा आढावा शांताआक्का या स्त्री व्यक्तिरेखेतून कादंबरीत घेतला आहे.

शांताआक्का ही भीवदादाची पत्नी असते. शांताआक्का आपल्या संसारात सुखा समाधानाने राहत असते. शांताआक्काची शरीररचना सडपातळ स्वरूपाची असते. उंच बांधा व कपाळभर मोठं लालजर्द कुंकू, गोरीपान अशी शांताआक्का असते. मुलबाळ नसल्यामुळे शांताआक्का ही सतत झुरत बसायची. शांताआक्काला वाटायचे की आपणाला सुद्धा एखादे मूल असावे. शांताआक्काला मुले नसल्यामुळे दादाच्या चुलत भावाच्या मुलग्यावर ती खूप प्रेम करीत असे. तिचे मातृप्रेम जागृत होई. मायेच्या भरात ती त्याला खेळवित असे. त्याला खाऊ देत असे. आपल्या मुलाप्रमाणे त्याचा सांभाळ करीत असे. पण या मुलग्याची आई ज्यावेळी त्याला घेवून जाई, त्यावेळी शांताआक्काला खूप वाईट वाटायचे व ती म्हणयाची ''आपुन कितीबी लळा लावला तरी दुसऱ्याचं लेकरू ते दुसऱ्याच'' (पृ. ६३) आपली सर यायची नाय... यातून शांताआक्काच्या मानसिक स्थितीचे दर्शन घडते.

भीवदादाचे वागणे दिवसेदिवस मौजमजा टवाळी यात चाललेले असते. यांचा शांताआक्काला खूप राग येत असे. कधी-कधी दोघांच्यात भांडण होत असे. त्यावेळी शांताआक्काला भीवदादा ''गप्प वांझुटे तुला का लेकरं व्हतेत?'' (पृ. ६३) अशा प्रकारची शिवी देत असे. यातून पुरूषप्रधान व्यक्तीकडून सर्व आक्षेप लादले जातात व स्त्रियांना दोषी ठरविले जाते. याचा प्रत्यय शांताआक्काच्या व्यक्तिरेखेतून प्रत्ययास येतो.

निष्पाप अशा कमजोर शांताआक्काचा खून भीवदादा करतो. मुलबाळाची अपेक्षा करणाऱ्या शांताआक्काला खूप वाईट मरण येते. शांताआक्का ही अनेक समस्याग्रस्त स्त्रियांची प्रतिक म्हणून कादंबरीत येते.

**सिद्धार्थ पांडागळे**

सिद्धार्थ पांडागळे या तरूणाची दलित पँथरमध्ये असणारी भुमिका या व्यक्तिरेखेतून कादंबरीत नजरेस येते. सिद्धार्थ पांडागळे हा दलित पँथरचा नेता आहे. त्याचे वडील सेवानिवृत्त शिक्षक असतात. सिद्धार्थने औरंगाबादला शिकायला असताना त्याने दलित पँथर चळवळीत सहभाग घेतला. अनेक चळवळीत पुढाकार घेतला. त्या काळातील सर्वात मोठी नामांतराची चळवळ होती. त्या चळवळीत सिद्धार्थने भाग घेतला. त्यामध्ये त्याला पोलिसांचा मारही खावा लागला. तसेच त्याला तुरूंगवासही होतो. यावरून त्याची दलित पँथरवरील असणारी निष्ठा प्रत्ययास येते. पण या चळवळीमुळे सिद्धार्थचे कॉलेजकडे दुर्लक्ष होते. त्यामुळे त्याची शैक्षणिक क्षेत्रात अधोगती होते. सिद्धार्थ पांडागळे याच्या अंगी नेतृत्वगुण असल्यामुळे तो राजकीय क्षेत्रात पुढारीपण करू लागतो. निवडणूक काळात त्याला खूप महत्त्व येत असे. पण या सिद्धार्थने पदवी पूर्ण केली नसल्यामुळे त्याला नोकरी मिळत नसते व नोकरी नसल्यामुळे त्याचे लग्न होत नाही. शेवटी या परिस्थितीमुळे त्यांचे मानसिक संतुलन बिघडते व तो वेड्यासारखा वागू लागतो. अशाच एके दिवशी लेखक गावी आले असताना लेखकाबरोबर त्याची गाठभेट होते. त्यावेळी त्याची अवस्था आगळ्या प्रकारची असते. मळके कपडे, केस वाढलेले, काखेत पिशवी व हातात जाडजूड फाईल असते. लेखकाबरोबर असणाऱ्या चंदूला बघून तो चंदूला विचारतो, 'हू इज धीज जंटलमन.' यातून सिद्धार्थचे इंग्रजी भाषेवर असलेले प्रभुत्त्व नजरेस येते. लेखकाला भेटताच 'जयभीम बंधू!' म्हणणारा सिद्धार्थ हा खरा समाजप्रेमी होता.

सिद्धार्थला डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्याबद्दल व गौतम बुद्धांच्याबद्दल खूप अभिमान होता. त्यांच्या विचाराने प्रेरित होवून त्याची अनेक मोर्चात आंदोलनात त्यांनी सहभाग घेतला. सिद्धार्थला बाबासाहेबांच "भारत बौध्दमय करीन" (पृ. ६६) हे स्वप्न साकार करायचे होते. यातून बाबासाहेबाच्यांबद्दल असणारी निष्ठा व्यक्त होते. साहित्यात फक्त जुने पुराणे मांडीत बसण्यापेक्षा आक्रमक पद्धतीने लेखणी लिहा अशा स्वरूपाचा इशारा सिद्धार्थने लेखकाला दिला.

सिद्धार्थच्या व्यक्तिरेखेतून सिद्धार्थचे समाजावर असणारे प्रेम, इंग्रजी भाषेतून संवाद व एका दलित पँथरच्या नेत्याची आयुष्याची झालेली वाताहात याचे दर्शन घडते.

**शेवंताबाई**

आपल्या समाजासाठी आपल्या जीवाचीसुद्धा पर्वा न करणारी व वयाची साठी ओलांडूनही मोर्चात सहभागी होणारी शेवंताबाई ही व्यक्तिरेखा कादंबरीत खूप महत्त्वपूर्ण ठरते. मराठवाडा विद्यापीठाला 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' यांचे नाव देण्यावरून मराठवाड्यात प्रचंड हाहाकार माजला होता. तेथील दलिताना सवर्णाकडून छळ होवू लागला. यासाठी प्रा. जोंगेद्र कवाडे यांचा लाँगमार्च नागपूरहून येणार होता. अशा लाँगमोर्चात प्रत्येक गावातील बौध्द बांधवांनी सामील व्हायचे ठरविले असतात व औरंगाबाद येथे लाखो भीम-अनुयायांचा मोर्चा घडवून नामांतर करण्याचा विचार होता. अशा लाँगमार्चमध्ये जाण्यासाठी येरमाळातील शेवंताबाई तयार झाली. शेवंताबाई वयस्कर असूनही औरगांबादपर्यंत जाण्याचा निर्धार हा खूप महत्त्वपूर्ण वाटतो. या वयातही तिचा जोश हा समाजभक्तीचा प्रत्यय नजरेस येतो. बाबासाहेब यांच्याबद्दल शेवंताबाईच्या मनात प्रखर आत्मनिष्ठा असते. या आत्मनिष्ठांचा प्रत्यय त्यांच्या उद्‌गारातून निर्दशनास येतो. "बाबांच्या नावासाठी जीव द्यायची तयारी हाय माजी. आता माजं काय राहयलंय? भिऊन राहण्यापरीस नावासाठी मरण आलेलं बरं!" (पृ. ६९) या त्यांच्या विधानामुळे त्यांच्या निर्भिड अशा निर्धारामुळे त्यांना त्यांच्या गावातील तुकडीच्या नेत्या म्हणून निवड केली जाते.

अशा या वयस्कर शेवंताबाईने सर्वात पुढे ध्वज घेवून लाँगमार्चला निघाल्या पण सरकारकडून या मार्चला हाणून पाडण्याचा बेत होता. यामुळे मांजरा नदीच्या पुलावर पारगाव येथे मार्चमधील सर्वांना अटक केली जाते. पण या परिस्थितीमध्ये सुध्दा शेवंताबाई पोलिसांना प्रतिकार करीत होती, घोषणा देत होती.

शेवंताबाई या खूप धाडशी, निर्भिड स्वभावाच्या असतात. अशा या शेवंताबाई काही दिवसानंतर अल्पशा आजाराने बुद्धवासी होतात.

**राणोजी बनसुड्या**

कादंबरीत खुटकंदिलाखाली अनेक घटना घडल्या असतात. अशाच एका घटनेतून राणोजी बनसुड्या यांची व्यक्तिरेखा निर्दशनास येते.

दलित समाजातील राणोजी बनसुड्या हा परगावचा रहिवाशी असतो. राणोजी बनसुड्या हा सुगीच्या निमित्ताने तो आपल्या कुटुंबासह येरमाळ्यात येतो व कायमचा या गावातच राहतो. अशा राणोजी बनसुड्याचे घर भीमनगरमध्ये असते. राणोजी बनसुड्या हा राहण्यास भीमनगरमधील वस्तीत असला तरी त्याला कोणी आपल्यात सामील करून घेत नसे. त्या वस्तीत कोणतेही लग्नकार्य किंवा मृत्यूकार्य असो, त्यात राणोजी बनसुड्याला भाग घेता येत नसे. त्याचबरोबर तेथील बायका ही राणोजी बनसुड्याची बायको केराबाई हिला जवळ घेत नसे. तिच्याशी बोलत नसे. यामुळे राणोजी बनसुड्या हा दुःखी असतो. आपलीच माणसे आपल्याला दूर कसे ढकलतात व दलित समाजातील विषमतेचे दर्शन राणोजी बनसुड्याच्या व्यक्तिरेखेतून नजरेस येते. राणोजीला या गोष्टीमुळे खूप त्रास होतो व एकटेपणा वाढत जातो. त्याला समाजात जावे असे मनोमनी वाटू लागले. यातूनच त्याने जात पंचायतीसमोर समाजात येण्यासाठी प्रस्ताव टाकला, ''कसंबी करा पण आमच्या तसब्या करा. म्या आपल्या आन् पंचाच्या पुढं नाय.'' (पृ. ५०) असे राणोजी पंचाना म्हणतो. शेवटी पंचाच्या निर्णयानुसार सर्वांच्या समक्ष राणोजी व त्यांच्या कुटुंबाला समाजात घेण्याचे ठरवतात पण

त्याबदलात राणोजीकडून पंचाना पानसुपारी व समाजातील लोकांना जेवण द्यावे लागते. राणोजी या गोष्टीला तयार होतो व राणोजीला भावकीत घेतले जाते.

राणोजीला समाजात येण्यासाठी असणारी तळमळ राणोजीच्या या विधानातून नजरेस येते, ''म्या इथंच मरणार, माझं मढं तुमच्या खांद्यावरच गेलं पाहयजे, तवां मला तुमचा बिछाईत वतनदार करनू घ्या. किती दिवस म्या गुंडकरी म्हणून राहू?'' (पृ. ५१) या तळमळीमुळेच व समाजाबद्दल असणाऱ्या निष्ठेमुळेच राणोजी बनसुड्याला हक्काचे गाव मिळालेले असते.

**श्रीपती अण्णा**

श्रीपती अण्णा ही व्यक्तिरेखा ग्रामपंचायतीमध्ये कामाला असते. गावामध्ये ठिकठिकाणी खुटकंदिल बसविलेले असतात. त्या खुटकंदिलात तेल घालणे, काच पुसणे, त्यामध्ये वात लावणे इ. कामे श्रीपती अण्णा करीत असे. अण्णा ग्रामपंचायतीमध्ये खूप दिवसापासून कामाला होते. अण्णाआपली कामे जबाबदारीने पार पाडीत असे. अशा कर्तव्यनिष्ठ अण्णाना ग्रामपंचायत म्हणजे आपले घर आहे असे वाटत असते. कारण अण्णाना बघावे तेव्हा ते ग्रामपंचायतीमध्ये दिसत असतात. त्यामुळे दलित समाजातील लोकांना वाटायचे की ही व्यक्ती मराठ्याची आहे. यावरून अण्णांची व्यक्तिरेखा अगदी ठळक नजरेस येते. पण कुणाकडूनही ते बदनाम झालेले नसतात. इतक्या इमानदारीने अण्णा आपली कामे करीत असे. अण्णाचा स्वभाव संकुचित प्रकाराचा असतो. त्यानी आपल्या कामाबिगर कुठेही लक्ष दिले नाही. अण्णाच्या गोऱ्या रंगामुळे तसेच पांढरे शुभ्र धोतर, अंगरखा, डोक्याला लाल रूमाल अशा वेशभुषेमुळे अण्णा मारवाड्यासारखे वाटायचे.

खुटकंदिल चालू करायचा सर्व लवाजमा घेवून श्रीपती अण्णा दिवस मावळायच्या आत बाहेर पडायचे. गावातील सर्व खुटकंदिल चालू करायला दोन-तीन तास लागायचं पण त्या खुटकंदिलात फक्त दोन मापटी रॉकेल भरीत असल्यामुळे तो कंदिल जास्त वेळ राहत नसे विझत असे.

गावातील लोकांना श्रीपती अण्णांच्या कामाबद्दन गैरसमज निर्माण झालेला असतो. कंदिल रात्रभर चालत नसल्यामुळे लोकांना वाटायचे की श्रीपती अण्णा हा रॉकेलमध्ये काहीतरी लुबाडणूक करतोय. श्रीपती अण्णाच्या व्यक्तिरेखेतून सरकारी खात्यातील लोकांच्या कामाचे, त्यांच्यावर होणाऱ्या आरोपांचे चित्रण कादंबरीत येते.

**धुराळा या कादंबरीतील व्यक्तिचित्रणे**

**सुदामा**

एका ऊसतोडणी कामगाराच्या जीवनाची कर्मकहाणी धुराळा या कादंबरीत आली आहे. अनेक ऊसतोडणी कामगाराचे प्रतिनीधी म्हणून सुदामा ही व्यक्तिरेखा कादंबरीत अविष्कृत झालेली आहे. सुदामा हा धुराळा या कादंबरीचा नायक आहे. सुरूवातीपासून ते शेवटपर्यंत संपूर्ण कांदबरी त्याच्याभोवती केंद्रित आहे. यामुळेच सुदामा हा वाचकाच्या मनात दिर्घकाळ स्मरणात राहतो. व त्याच्यावर झालेल्या व्यथा वेदनाचे चित्रण हे वाचकाला अंतर्मुख करण्यास भाग पाडतो.

सुदामा हा देवाची वाडी येथे राहत असतो. तो नानाचा एकुलता एक मुलगा असतो. तो खूप लाडात वाढलेला असतो. त्यामुळे तो कामात आळशीपणा करीत असे. सुदामाचे कुटुंब लहान असते. तो त्याची पत्नी मालन, वडील नाना व एक मुलगी असा सुदामाचा परिवार असतो. त्यांचे वडील कष्टाळू असतात. त्यामुळेच घर व्यवस्थित चालत असे. एके दिवशी नानाचा मृत्यू होतो व घरची सर्व जबाबदारी सुदामाच्या अंगावर पडते. सुदामाची वीस एकर शेती असते. घरात बैलजोडी ही असते. यांची देखभाल सुदामाला करावी लागत असे.

सुदामाची बायको त्याला सतत शेतावर जावा. शेती पिकवा अशी म्हणत असे. व सुदामाला त्यांच्या कामाची जाणीव करून देत असे. पण सुदामा मात्र शेताकडे जातो असे म्हणून तो गावातील लोकांबरोबर मारूतीच्या देवळात पत्यांनी खेळत असे. यावरून सुदामाच्या स्वभावाचे दर्शन होते.

सुदामाचा हा प्रकार सतत रोज सुरू असायचा. व मालनला ही खूप समाधान वाटायचे पण एके दिवशी उत्तरेश्वर भाऊजी मालनच्या घरात येतात व सुदामाचा चाललेला प्रकार मालनच्या नजरेस येतो. यामुळे सुदामा व मालन यांच्यात सतत भांडण होत असे. पण या भांडणाच्या काहीही प्रभाव सुदामावर पडत नाही. उलट तो जास्तच वेळ गावातून फिरत असे. सुदामा हा स्वत:च्या मनाप्रमाणे वागत होता. सुदामाला काम करायला आवडत नसे. फक्त खाणे-पिणे व गावातून फिरणे हा त्याचा दिनक्रम होता. गावातील ग्रामपंचायतीच्या ऑफिसात जावून बसणे, बी-बियाणे वाटणे, अशा प्रकारची तो कामे करीत असे. आपला दिवस घालवित असे. सुदामा हा बायकोचे ऐकत नसे. वरती तिलाच म्हणायचा माझा मी मालक हाय, शेतात जाईन नायतर तसाच बसेन तू कोण इचारनारी? (पृ. ३७)

सुदामाला गावातील ग्रामपंचायत व सोसायटीचे कार्यालय याबद्दल खूप आकर्षण वाटायचे. त्यामूळेच तो त्या ठिकाणी रोज जात असे. ग्रामपंचायतीच्या ऑफिसात सायबाचे बोलणं, पंख्याच गरगरण, तिथल्या खुर्च्या, तक्क्या, लोडं, मोठी सतरंजी, भिंतीवर लावलेलं घड्याळ, घड्याळाचे टोले, सरपंच आणि पंचाच्या नावाचा बोर्ड हे सर्व पाहून आश्चर्यचकित व्हायचा.

सुदामाला या ऑफिसातच फॅक्टरी मुकादम त्रिंबकराव यांची ओळख होते. त्रिंबकरावाचे फॅक्टरीबद्दल मोठ मोठे बोलणे पाहून तो दंग होतो. तसेच त्रिंबकरावाच्या गळ्यातील लॉकेट पाहून सुदामाला नवलच वाटायचे. त्रिंबकरावानी सांगितलेल्या भूलथापाच्या आहारी सुदामा जातो. त्याला पैशाची हाव सुटते. फॅक्टरीवर कामाला जावून भरपूर पैसा, सोने मिळवू असे सुदामाला वाटू लागले त्यातूनच तो फॅक्टरीवर ऊसतोडणीचे काम करण्यासाठी तयार होतो. यासाठी तो आपल्या पत्नीला सुद्धा त्या कामाबद्दल माहिती देतो. पण मालन सुदामाला या कामासाठी नकार दर्शविते. तिला वाटत असतेकी गावातच रहावे. शेती करावी, पण सुदामाच्या डोक्यात फॅक्टरीचा नाद

जडलेला असतो. तो पत्नीला म्हणतो "व्हय गं लय पैसा येतोय!" ह्ये म्हणत्येय चार दिसाच्या मजुरीत वाटेल तेवढ खा, चार दिसाची मजुरी मागं टाका. महिन्याभरात हजार – बाराशे रूपयं मागं पडले. सा महिन्यात पाच – सहा हजार सरळ मिळत्येय. खाऊन पिऊन बक्कळ पैका मागं पडतोयं" (पृ. ४४) यावरून सुदामाच्या मानसिक तयारीचे दर्शन होते. शेवटी सुदामाच्या हट्टापुढे मालन फॅक्टरीवर काम करण्यास तयार होते. अशा साध्या भोळ्या सुदामाला आपल्या गावच्या शेतीबद्दल जराही विचार नसतो. त्रिंबकराव व सुदामा मिळून गावातील अनेक लोकांना पैशाचे आमिष दाखवून फॅक्टरीवर येण्यास प्रवृत्त करतात. सुदामाला या कामाबद्दल खूप विश्वास असतो. व त्यांनी काही स्वप्ने ही रंगविलेली असतात.

सुदामाला फॅक्टरीवर जाण्याच्या इराद्याने खूप आनंद होतो. फॅक्टरीवर जाताना नवीन पालकूरचा पटका, पांढर कुडतं, गळ्यात काळा दोरा, दाढी करून अगदी रूबाबात तो तयार होतो. सर्वात पहिला सुदामाची गाडीच बाहेर पडते व त्यापाठीमागं गावातील इतर लोक फॅक्टरीकडे जातात यातून सुदामाला या कामाविषयी लागलेली ओढ नजरेत येते.

सुदामा फॅक्टरीवरील वर्दळ पाहून आश्चर्यचकित होतो. सुदामाला ऊसतोडणीच्या कामाबद्दल खूप निष्ठा, आशा वाटते. तेथील उघड्यावरचे जीवन सुदामाला नवीन असते. रोजच्या कामाच्या सवयीने त्याला तेथील राहणीमानाची सवय होते. रोज सकाळी लवकर उठून कामाला जाणे हा त्याचा रोजचा दिनक्रम असे. सुदामाच्या हातात चार पैसे आल्यानंतर सुदामाला उधळपट्टीची सवय लागते. तो चिच्याच्या हॉटेलात रोज पैसे खर्च करीत असे त्याचा खर्च वाढतो. चिच्याच्या हॉटेलात उधारी वाढते. ज्या उद्देशाने सुदामा फॅक्टरीला आलेला असतो. तो उद्देश साध्य होत नसल्यामुळे सुदामा हा मनोमनी नाराज असतो. दिवस रात्र काम करूनही पैसे जमा होत नसतात. उलट तो कर्जबाजारी झालेला असतो. यामुळे सुदामाला फटकरीला आल्याचा

पश्चाताप होत असतो. सुदामा फटकरीच्या कामाला आल्यामुळे त्याच्या बायका मुलाचे, जनावरांचे अतोनात हाल होत असते. त्यातच त्रिंबकरावाचा मित्र गबरू हा सुदामाच्या पत्नीला सतत त्रास देत असतो. याची जाणीव सुदामाला सतत असायची एके दिवशी सुदामा ऊसतोडणीला गेला असताना, गबरू सुदामाच्या झोपडीकडे येतो व अतिप्रसंग करण्याच्या इराद्याने तो झोपडीत शिरत असतो तितक्यात सुदामा तेथे येवून गबरूच्या अंगावर वार करतो. वार चुकतो व गब्बरूचा हात तुटतो, गबरू पळून जातो पण गब्बरू आपल्यावर केस करील या भितीने परागंदा होतो. तो आंबेवाडीच्या हॉटेलात कामाला लागतो पण तेथेही नियती त्याला जगू देत नाही. एका साध्या वेशातील पोलिसाला ही बातमी समजते व पोलिस सुदामाला पकडून नेतात. निरागस, प्रामाणिक व साध्या भोळ्या सुदामाचे चार पैसे मिळविण्याच्या लोभापायी सारे आयुष्य उध्वस्त होते. सुदामा ही व्यक्तिरेखा अनेक ऊसतोडणी कामगाराचा प्रतिनिधी म्हणून कादंबरीत येते.

**मालन**

'धुराळा' या कादंबरीत सुदामाबरोबर सतत नजरेस येणारी 'मालन' ही स्त्री व्यक्तिरेखा महत्वपूर्ण ठरते. मालन ही सुदामाची पत्नी आहे. आपल्या संसारास वारंवार सावरणारी व प्रसंगी सुदामाला चांगला सल्ला देणारी मालन ही नजरेत येते. सुदामाच्या वडिलांच्या मृत्यूनंतर घरची जबाबदारी ज्यावेळी सुदामावर पडते. त्यावेळी आपल्या पतीला शेतीची आवड लागावी म्हणून ती वेळच्या वेळी सुदामाला आपल्या कर्तव्याची जाणीव करून देत असते. मालन या व्यक्तिरेखेतून ग्रामीण जीवनातील संस्कारी स्त्रीचे दर्शन घडते. आपला नवरा शेती सांभाळतो याबद्दल मालनला खूप समाधान वाटायचे. पण सुदामा हा शेतात जाण्याऐवजी गावातून फिरत असतो. ही बातमी ज्यावेळी मालनला समजते. त्यावेळी तिला खूप राग येतो. त्या रागातून सुदामा व मालन यांच्यात सतत भांडण होत असे.

मालन जितकी प्रेमळ स्वभावाची आहे तितकीच ती रागीट याचा प्रत्यय कादंबरीतून घडते. त्रिंबकरावाच्या बोलण्याला, रूबाबाला बळी पडून ऊसतोडणी काम करायला जाणाऱ्या सुदामाला ती सावध करते. त्रिंबकरावाच्या स्वभावाची कल्पना मालनला येते. त्यामुळे ती फॅक्टरीवर काम करण्यास विरोध करते. समजूतदार अशी मालन म्हणायची की "आपल्या शेतात मायदंळ काम हाय, तेच सरता सरत नाय अन् दुसरीकडं जाऊन काय करायचं? आपल्या शेताचा दुष्काळ करून दुसऱ्याच्या कारखान्यावर काम करनं बर हाय व्हय? जिथं मालकी हाय तिथं मालक म्हणून राहायचं नाय अन् दूसऱ्याच्या घरी चाकर म्हणून राहणं लय चांगल हाय व्हयं?" (पृ. ४५) यातून मालनच्या स्वभावाची ओळख होते. मालनला आपल्या शेताबद्दल असणारे ज्ञान यातून समजते. फॅक्टरीवर जाण्यास विरोध करणारी मालन ही आपल्या पतीच्या शब्दापुढे जात नाही व ती फॅक्टरीवर जाण्यास तयार होते. यातून आपल्या नवऱ्याला महत्व देणारी मालन ही व्यक्तिरेखा ग्रामीण स्त्रीचे अस्सल दर्शन घडविते.

मालन ही सुदामाला प्रत्येक कामात मदत करीत असे. फॅक्टरीवर कामास गेल्यानंतर सुदामबरोबर ती फडात ऊसतोडणीस जात असे. मालनच्या कष्टाळू, धडपडी स्वभावामुळे मालन ही व्यक्तिरेखा दिर्घकाळ स्मरणात राहते. मालनला घर व ऊसतोडणीचे काम या दोन्ही बाजू तिला सांभाळावे लागत असे. पण इतके काम असूनही ती कधी खचली नाही.

मालनला घाणेरडापणा, अस्वच्छतापणा आवडत नसे, ज्या दिवशी फटकरीला सुट्टी असत. त्यादिवशी सर्व घर स्वच्छ करीत असे. अशाच एके दिवशी ती उघड्यावर आंघोळ करीत असताना कोणीतरी शीळ घालण्याचा आवाज येतो. ती घाबरते गडबडून आवरते. तिला या गोष्टीचा खूप राग येतो. ती म्हणते 'कोण मुडदा असलं? कुणी शिळ घातली?" (पृ. ७०) यातून मालनचा करारीपणा नजरेस येतो.

मालन ही गरीब असली तरी तिला तिची इज्जत महत्वाची असते. यातून एका संस्कारी, खानदानी स्त्रीचे रूप मालनाच्या वर्तनातून निदर्शनास येते.

मालनच्या मुलगीला बरे नसते, त्यावेळी तिचा आजार कमी होण्यासाठी ती पऱ्यागबाईचा अंगारा लावते, मरीआईला हात जोडते यातून तिचे अंधश्रद्धेवर असणारा विश्वास निदर्शनास येतो.

सुखी संसाराची स्वप्ने बघणाऱ्या मालनच्या आयुष्यात सदा दु:खच येत असे. नवऱ्याच्या फॅक्टरीवरील कामामुळे सोन, नाणे घ्यायची आशा ही पूर्ण होत नाही.

मालनला फॅक्टरीवरील गबरूचा सतत त्रास होत असे. गबरूचा त्रास वाढतच जातो व एके दिवशी सुदामाकडून त्या गब्बरूचा हात तुटला जातो. पण नवऱ्याच्या पळून जाण्यामुळे मालन ही एकटी पडते. अशा मालनच्या आयुष्याची कशी वाताहात होते याचे प्रभावी चित्रण 'मालन' या व्यक्तिरेखेतून साकार होते. सुदामाच्या प्रत्येक सुख दु:खात समाविष्ट असणारी, कष्टाळू स्वभावाची धाडशी अशी मालन वाचकांच्या मनात दिर्घकाळ राहते.

**नाना**

देवाच्या वाडीतील एक सभ्य गृहस्थ म्हणून नाना परिचीत असतात. नानाच्या व्यक्तिरेखेतून एका कष्टाळू शेतकऱ्याचे चित्रण लेखकानी केले आहे.

नाना हे देवाच्या वाडीतील प्रतिष्ठित व्यक्ती असतात. त्यांचे संपूर्ण आयुष्य हे शेतीकामात गेलेले असते. त्यांची शेतीवर खूप निष्ठा असते. नानाच्या पत्नी मेलेल्या असतात. त्यामुळे नाना एकटेच पडलेले असतात. अशा एकटेपणामुळे ते कोणाशीही जास्त बोलत नसे. नानाला सुदामा नावाचा एकुलता एक मुलगा असतो. तसेच त्याची पत्नी व नात असा नानाचा परिवार असतो. नाना हे स्वावलंबी असतात. ते आपले

काम स्वत:च करीत असे. इतराना त्रास देत नसे. नाना वयस्कर झालेले असतात तरीही त्यांनी कधी सुदामाला काम लावले नाही.

नाना पहाटे उठून शेतावर जात. नानानां देवाबद्दल खूप श्रद्धा होती या श्रद्धेपोटीच ते रोज मारूतीचे दर्शन घेत असे. नानांना झाडाविषयी सुद्धा खूप प्रेम होते. त्यांनी आपल्या शेतात जांभळाची, आंब्याची, काटशिवरीची झाडे लावलेली असतात. अशा या झाडाखालून जात असताना नानाना खूप समाधान वाटे. झाडावरील पक्ष्यांशी सुद्धा मनोमनी नाना हितगुज करीत असतात. शेतातील बांधावरती दगडे, पालापाचोळा गोळा करून ओढ्याच्या बाजूने ते रचत असे. असे काम करीत असताना दुपार केव्हा झाली हे नानाला कळत नसे. इतके कामात मग्न असत. नाना मोठमोठे दगड ढकलत आणीत वयस्कर अशा नानाच्या अंगामध्ये बळ नसले तरी काम करण्याची प्रखर इच्छाशक्ती निर्दशनास येते. इतके कष्टाचे काम केल्यामुळे ते थकून जात असे. असा नानाचा दिनक्रम असतो.

एके दिवशी असेच रानात काम करित असताना नानाच्या पायावर दगड पडतो त्या ठिकाणी जखम होते, त्याचा आजार वाढतो. नाना अंथरूणाला खिळून राहतात, त्या गोष्टीचे गांभीर्य घेतले जात नाही, त्या आजारातच नानाचा मृत्यू होतो.

नानानी मृत्यूसमयी सूनेला व सुदामाला सांगतात, ''नीट रहा, सांभाळा, शेतापोताची आबाळ करू नका.'' (पृ. २७) यातून नानाचे मुलाप्रमाणेच शेतीवर असणारे प्रेम प्रत्ययास येते. नानाची व्यक्तिरेखा एक कष्टाळू स्वभावाचा शेतकरी म्हणून कादंबरीत चित्रीत झाला आहे.

**चिच्च्या**

'धुराळा' या कांदबरीत चिच्च्या ही एक महत्वूपर्ण व्यक्तिरेखा आहे. चिच्च्याचे फॅक्टरीवरती एक छोटेसे हॉटेल असते. चिच्च्याचे मूळगाव देवळाली हे असते. चिच्च्याचे

मूळ नाव अब्दुल गौस देवळालीवाले असे असते त्याला सर्वजण चिच्या या टोपणनावाने हाक मारीत असतात. चिच्याच्या वाडवडिलांची देवळालीला खूप जमीन व इस्टेट होती. चिच्या सहा वर्षाचा असताना त्यावेळी रझाकारांनी त्या गावात हल्ला केला होता. रझाकाराच्या भीतीने चिच्याचे कुटुंब दूर परगावी पळून जातात चिच्याची जमीन गावातील अनेक लोक हडप करतात. काही वर्षानी चिच्या आपल्या गावी येतो. पण त्या गावात त्यांची इस्टेट लोकांनी हडप केली असल्यामुळे तो शमशुद्दीन बाबाच्या पीराजवळ राहून एक छोटेसे घर बसवितो. व आपल्या संसाराची सुरूवात करतो. अशा चिच्यानी खूप हलाखीतून व कष्टातून आपल्या जीवनाची सुरूवात केली असते. चिच्याला शमशुद्दीन बाबाबद्दल मनात खूप श्रद्धा असते. या श्रद्धेमुळेच त्याला प्रेरणा मिळाली असते. व त्यामुळेच त्याने फॅक्टरीच्या आवारात वाकड्या बाभळीच्या झाडाखाली 'शमा हॉटेल' या नावाने हॉटेल सुरू केलेले असते. त्या फॅक्टरीमध्ये कामाला असलेले कामगार, गाडीवान अशी अनेक लोक चिच्याच्या हॉटेलात येत असतात. चिच्याचा स्वभाव प्रेमळ होता हॉटेलमध्ये आलेल्या गिऱ्हाईकाची तो आस्थेने विचारपूस करीत असे चिच्याला तेथील व्यक्ती जशी प्रिय असतात तशीच मुक्या प्राण्याबद्दल सुद्धा मनात प्रेम असे. बैलाला उपाशी ठेवून काम करून घेणाऱ्या गाडीवानाला तो खडसावून सांगत "अरारा ऽ चांडाळा, मुक्या जिवाला एवढं उपासी मारीत असत्येत व्हय? अरं एवढं मिळवून तरी काय करणार?" पृ. ८ यावरून चिच्याच्या मनात जनावराबद्दल प्रेम दिसून येते.

चिच्याच्या हॉटेलात गाडीवान खूप उधारी करीत. पण या उधारीबद्दल चिच्या गिऱ्हाईकाला समजावून सांगत असे. त्याला दमदाटी अगर अरेरावी करीत नसे. त्यामुळे सर्व कामगार त्याचा आदर करीत असे व चिच्याही त्यांना नाराज करीत नसे. यातून मायाळू स्वभावाचा चिच्या हा महत्वपूर्ण ठरतो.

चिच्याची व सुदामाची हॉटेलात ओळख होते. चिच्याला लांबून काम करण्यासाठी आलेल्या कामगाराची कीव येत असे. यामुळेच त्यांची आस्थेने विचारपूस करीत असे. चिच्या सुदामाकडूनही त्यांच्या गावची माहिती काढून घेतो. चिच्याला एका गोष्टीचा खूप राग येत असे ती म्हणजे फॅक्टरीवर कामगारानी आपल्या बायकापोराना घेवून येणे, बायकापोराना घेवून आलेल्या कामगाराला चिच्या म्हणायचा "आर्र ऽ ह्येच गलती करता है लोगा, जनाना का क्यू लानेका? (पृ. ५८) पण चिच्याच्या बोलण्याकडे कोणी लक्ष देत नाहीत. चिचा हा बोलका स्वभावाचा असतो. तो प्रत्येकवेळी बोलताना काहीतरी बोध गाडीवानाला देत असे. दहा पंधरा एकर शेती असणाऱ्या गाडीवानाला तो सहज म्हणायचा "मला समजत नाय, एवढ्या लांब यायची काय गरज व्हती? (पृ. ५८) चिच्याला यातून सांगायचे असते की, स्वत:ची जमीन पडीक ठेवून चार पैसे मिळविण्याच्या नादात हे लोक फॅक्टरीवर येतात व कर्जबाजारी होतात व त्याचबरोबर बायका, मुले व जनावरे यांचेसुद्धा हाल होते.

फॅक्टरीवरील गाडीवानाना विसाव्यासाठी, क्षणभर विश्रांतीसाठी चिच्याचे हॉटेल उपयोगी पडत असे. चिच्या व त्याचा धाकटा मुलगा हॉटेल सांभाळत एखाद्या दिवशी गाडीवानकडे पैसे नसेल तर त्याला तो नाराज करीत नसे. त्याला चहापाणी देत असे व म्हणत असे "आठवणीन दोन रूपये आणून दे म्हजीं झाल!" (पृ. ७२) असा हा चिच्या व्यवहारी असला तरी माणुसकीला महत्व देणारा आहे.

चिच्याची व सुदामाची चांगली ओळख असते. सुदामाने त्याच्या दुकानात उधारी लावलेली असते. पण या सुदामाची जर कोणी स्तुती केली की त्याच्या साथीदारांना तो चहापानी देई. ही बाब चिच्याला खटकत असे तो सुदामाला म्हणायचा "कशाला लोकांना फुकट चहापाणी करतो, इथं का तुझं गाव का शेतीवाडी? फुकट्यांना काय जेवढं वर मिळेल तेवढं बरंच हाय."(पृ. ७५) अशा पद्धतीने तो सुदामाला जागृत करीत असतो.

चिच्या ही व्यक्तिरेखा कांदबरीत महत्वपूर्ण ठरते. चिच्याच्या विविध स्वभावाचे दर्शन, त्याचा मनमिळावूपणा, प्रेमळपणा, तसेच जनावराच्याबद्दल मनात कळकळ असणारा चिच्या कांदबरीत नजरेस येतो.

**त्रिंबकराव**

त्रिंबकराव ही व्यक्तिरेखा देवाच्या वाडीतील टोळीचा मुकादम म्हणून कादंबरीत अवतरली आहे. त्रिंबकराव ही बोलक्या स्वभावाची व्यक्तिरेखा आहे. मोठ-मोठ्या बोलण्याच्या जोरावर तो आपला स्वार्थ साधून घेत असे. त्रिंबकरावाचा रुबाब हा श्रीमंत माणसासारखा असे. दाढीच खुटं वाढलेली, उलटे केस पाडलेले, चपचप तेल लावलेला, हातात कडं असलेला, पट्यापट्याचा अर्ध्या बाह्यांचा बुशशर्ट, निळ्या रंगाची पँट, कानात अत्तराचा फाया व सोबत सिगारेटचा झुरका या रूबाबदार व्यक्तिमत्वामुळेच त्रिंबकराव समोरील व्यक्तीवर छाप पाडीत असे. त्रिंकरावाच्या बोलण्यात सामर्थ्य असे. देवाच्या वाडीतील लोकांवरही त्याने असाच छाप पाडला.

त्रिबंकरावाच्या भूलथापा व त्रिंबकरावाच्या अंगावर असणाऱ्या सोन्याच्या लॉकेटाकडे पाहून लोक त्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवत. याचा गैरफायदा त्रिंबकरावांनी घेतलेला असतो. फॅक्टरीच्या कामाबद्दल तो सतत म्हणत असे ''आमच्या फॅक्टरीत मायंदळ पैका, फॅक्टरी सुरू झाली म्हंजी बघा सहा तास काम करायंच आन् अठरा तास निस्त बसायचं पण आठशे रूपयाला मरण नाही.'' (पृ. ४०) अशा भूलथापा लावून तो देवाच्या वाडीतील लोकांना फॅक्टरीवर ऊस तोडणीचे काम करण्यासाठी प्रवृत्त करतो.

देवाच्या वाडीतील सर्वांना या फॅक्टरीच्या कामाच्या रोख पैशाचे वेड लागलेले असते. यामुळे देवाच्या वाडीतील लोक ऊसतोडणीचे काम करण्यास फॅक्टरीत जातात.

वाडीच्या लोकांना तो चहापानी देत असे, तसेच ऊसतोडणीचे साहित्य ही नवीन आणून देतो, त्यामुळे लोकाना त्रिंबकरावाच्या बद्दल आदर निर्माण होतो.

त्रिंबकराव गबरुचे खास मित्र होते. गब्बरू सारख्या श्रीमंत माणूस त्रिंबकरावाला मिळाल्यामुळे गब्बरूच्या प्रत्येक कामात त्रिंबकराव मदत करीत असे. सुदामाच्या पत्नीला त्रास द्यायच्या कारस्थानात त्रिंबकरावाचाही हात होता. पैशासाठी माणुसकी विसरणारा, ज्या लोकांच्या जीवावरती तो जगतो, त्यांना धोका देणारा त्रिंबकराव हा कांदबरीत महत्वपूर्ण ठरतो.

**गबरू**

'धुराळा' या कादंबरीत गबरू ही व्यक्तिरेखा मालकी प्रवृत्तीचे दर्शन घडविते. गबरू हा मोठा बागायतदार असतो. त्यांचे वाघोलीला चार एकर ऊस असतो, या ऊसाची तोड करण्यासाठी फॅक्टरीवरील मुकादम त्रिबंकरावाला सोबत घेवून गबरू देवाच्या वाडीतील टोळीकडे जातो. गबरूची श्रीमंती त्याच्या रूबाबदार पोशाखातून नजरेत येते. त्यांच्या गळ्यात सोन्यांच लाकीट, उजव्या हाताच्या चारी बोटात अंगठ्या, पांढरीधोट कापडे, डोक्याला चपचपीत तेल. असा हा गबरू देवाच्या वाडीतील लोकांवर आपल्या श्रीमंतीची छाप पाडतो. गबरू हा स्त्रीलंपट स्वभावाचा असतो. गबरूला स्त्रियांबद्दल खूप आकर्षण असते. या आकर्षणा पोटीच त्याचा डोळा सतत वाडीतील बायकावरती असे, गबरूच्या अशा स्वभावाची बळी सुदामाची बायको मालन ठरते.

देवाच्या वाडीतील टोळी ही गावाकडे जात असते. त्यावेळी त्रिबंकरावाच्यामुळे गावाकडे जाण्याचे रद्द होते व गबरूच्या फडाचे काम मिळते. पण देवाच्या वाडीतील लोंकानी दाखवलेल्या माणुसकीचा गबरू कडून गैरफायदा घेतला जातो. गबरूचे यापाठीमागे कूटनीती असते. त्याला मालनबद्दल खूप आकर्षण वाढले

असते. त्याने अनेकदा सुदामाची बायको आंघोळ करीत असताना तिला फडातून पाहिलले असते. व अशा अवस्थेत तो शीळ ही घालत असे. असा वासनेने पेटलेला गबरू कादंबरीत निर्देशनास येतो.

एके दिवशी सुदामा फडात गेला आहे, हे जाणून घेवून गबरू मालन कडे येतो. आजूबाजूला कोणी नाही ते बघून तो झोपडीकडे जात असताना त्याच्यावर सुदामा कोयत्याने वार करतो. त्यात त्यांचा हात तुटतो, या अवस्थेत तो तेथून पळून जातो. पण या गबरूमुळे सुदामाच्या आयुष्याची वाताहात हाते.

असा हा श्रीमंत असलेला, कामगाराच्या बायकावर हात टाकणारा वासनेने पेटलेला गबरू 'धुराळा' कादंबरीत नजरेस येतो.

**हॉटेल मालक**

ज्या शिवशंकर हॉटेलात कादंबरीचा नायक सुदामा हा कामाला असतो त्या हॉटेल मालकाच्या स्वभावाचे दर्शन करणारी व्यक्तिरेखा ही 'धुराळा' या कादंबरीत वैशिष्ट्यपूर्ण ठरली आहे. आंबेवाडीतील हॉटेल शिवशंकर हे प्रसिद्ध हॉटेल असते. अशा हॉटेलात सुदामा हा काम करण्यासाठी येतो. त्यावेळी हॉटेल मालक त्यांच्याबद्दल सर्व माहिती जाणून घेवूनच त्याला कामाला ठेवतो. हॉटेल मालक हा स्वभावाने खूप कडक असतो, जरासुद्धा चूक त्याला आवडत नसे. सुदामाकडून एखादी चूक झाल्यास तो त्याला शिवीगाळ करीत असे. सतत त्यांचा गिऱ्हाईकासमोर अपमान करीत असे. सुदामाच्या लाचारीचा फायदा हॉटेल मालक घेत असतो. मालकाला बिनपगाराचा कामगार मिळालेला असतो. दोन वेळेच्या जेवणाच्या मोबदल्यात सुदामाकडून भरपूर कामे हॉटेल मालक करून घेत असे. मालकाला मालकीपणा दाखवण्याचा स्वभावच असतो. छोटी छोटी कामे ही तो सुदामाकडून करून घेत असे.

सकाळच्या वेळी मालक पूजा करीत असताना पूजेचे ताट सुदामाकडून घेई व त्यालाच म्हणायचा "बाजूला सरक. त्वा आंगूळ केली नाहीस" (पृ. १५) या वाक्यातून त्याचा दूजाभावपणा, गर्विष्ठपणा नजरेत येतो. हॉटेलातील काम नव्हे तर ते वैयक्तिक कामेही त्याच्याकडून मालक करून घेत असे. मालकाचे अंथरूण काढणे, मालकाला आंघोळीला पाणी काढून देणे यासारखी किरकोळ कामे ही तो सुदामाला लावत असे. हॉटेल व्यवसायातील वस्तुस्थितीचे दर्शन ही हॉटेल मालक यांच्या दर्शनातून होते. गिऱ्हाईक भाजीवर जास्त ताव मारायला लागले की भाजीत पाणी घालून वाढवायला सांगत असे. यातून हॉटेल मालकाच्या व्यावसायिक स्वभावाचे प्रभावशाली चित्रण होते. सुदामामुळे हॉटेल मालकाची खूप भरभराटी झालेली असते. एकेकाळी किंमत नसलेल्या हॉटेल शिवशंकरला खूप महत्व प्राप्त झालेले असते. हॉटेल मालकाने दहा एकर जमीन घेतली, विहीर खोदली, अशी संपत्ती प्राप्त केलेल्या हॉटेल मालकाला मात्र सुदामाबद्दल जरासुद्धा दया माया नसते.

हॉटेल मालकाच्या व्यावहारीकपणाचे, रागीट स्वभावाचे व स्वार्थी वृत्तीचे दर्शन 'धुराळा' या कादंबरीतून घडते.

**प्रसंगनिर्मिती**

कादंबरीच्या निरनिराळ्या वैशिष्ट्येपैकी 'प्रसंगनिर्मिती' हे प्रमुख वैशिष्ट्य आहे. कथा कादंबरीतून काही तरी सतत घडत असते किंवा कोणाकडून तरी घडविले जाते. कथानकाचा सांगाडा मुख्यत: निरनिराळ्या प्रसंगातून आवश्यक त्या रितीने आकार घेत असतो. त्यामुळे कथा कादंबरीमध्ये कोणती ना कोणती कृती घडत असते. पात्राच्याद्वारे ती कृती घडविली जाते. त्यापाठीमागे कार्यकरणाचे संबध असतात. हे सबंध प्रसंगचित्रणातून उलघडले जातात. त्यातून कादंबरी तरी व्यक्तिपात्राच्या स्वभाव वैशिष्टयावर प्रकाश टाकला जातो. विशिष्ट प्रसंग विशिष्ट तऱ्हेने चित्रित करण्याचा लेखकाचा प्रयत्न असतो.

सामान्यत: प्रसंगचित्रण हे वास्तव अनुभवावर आधारलेले असते. श्री योगीराज वाघमारे यांच्या 'पडझड' आणि 'धुराळा' या कादंबरीतून उत्कृष्ठ प्रसंगनिर्मिती केली आहे. प्रस्तुत दोन्ही कादंबऱ्यातून मानवी जीवनातील वास्तव चित्र साकारले आहे. मानवी जीवनातील सुख दु:खाचे, व्यथा वेदनाचे अनेक प्रसंग 'पडझड' व 'धुराळा' या कादंबऱ्यातून साकार झाले आहेत.

**'पडझड' मधील प्रसंगनिर्मिती**

'पडझड' या कादंबरीतील प्रसंग निर्मितीमुळे लेखकानी अनुभवलेल्या व्यक्तिरेखा जीवंत होतात. योगीराज वाघमारे यांनी कोणताही फापटपसारा न मांडता अगदी मोजक्याच शब्दात प्रसंगनिर्मिती  साधली आहे, 'पडझड' या कादंबरीतील अनेक घटनाप्रसंग जीवाला चटका लावणारी आहेत. दलित समाजातील लोकांच्या व्यथा वेदनांचे यथायोग्य दर्शन 'पडझड' मधील प्रसंगवर्णनातून नजरेस येते. कांदबरीतील व्यक्तींचा जीवनालेख वेगवेगळ्या प्रसंगातून निदर्शनास येताना दिसतो. कादंबरीच्या सुरूवातीला येणाऱ्या घटनाप्रसंगातून लेखकांच्या गावी लेखकांचा सत्कार होणार असतो. त्यावेळी त्यांना निमंत्रण देण्यासाठी आलेल्या शिक्षणविस्तार अधिकाऱ्याच्या बोलण्यातून आलेले पावसाचे वर्णन महत्वपूर्ण ठरते. लेखक त्या अधिकाऱ्याला विचारतात. ''येरमाळ्याकडं पावसाचं कसं काय?''

''छ्या तिकडं बी काहीच नाय, पहिले दोन पाऊस पडले, त्याच्यानंतर काहीच नाही. इकडं सावरगाव - तुळजापूरजवळ बरं हाय. पिकंही बरी हायीत.'' अशा छोट्या छोट्या प्रसंगातून पावसाच्या अवस्थेचे यथायोग्य दर्शन घडते.

'पडझड' या कादंबरीत काही अस्वस्थ करणारे प्रसंग आहेत. मारूती मांगा कडून सोन्याची बिस्किटे काढून घेणारा पाटील यांच्यातील घडलेला प्रसंग हा वास्तव स्थितीचे दर्शन घडविणारा आहे. ज्यावेळी पाटील मारूतीला वाड्यावर बोलवितो त्यावेळी तेथे घडलेला प्रसंग

पाटील मारूतीला म्हणतो "कुठं डाका घातला?"

"नाय मालक तुमच्या पाया शप्पत"

मग त्याने सर्व काही सांगितले पाटील समजून चुकले.

"एवढचं हाय ना?"

"व्हय मालक"

"बघ हं?"

"खरं!"

"बरं बरं जा आता यातलं कुणालाही कळता कामा नये. नाहीतर तुला पोलिसाच्या ताब्यात देईन." (पृ. २६).

या प्रसंगातून दलित समाजातील लोकांचे सवर्ण समाजाकडून कसे शोषण केले जाते. याचा प्रत्यय या प्रसंगातून नजरेस येतो.

शेटीबादादाच्या मृत्यूसमयीच्या प्रसंगवर्णनातून भारतीय सैनिकाच्या करूण अवस्थेचे दाहक चित्रण कादंबरीत आले आहे. एस. आर. पी. चा जवान ज्यावेळी लोभीला बघायला येतो. त्यावेळी तेथे घडलेल्या प्रसंगातून लग्न होत नाही म्हणून खोटे बोलणाऱ्या व आपला स्वार्थ साधून घेण्याच्या जवानाचे दर्शन घडते. अगदी रूबाबात एस. आर. पी. चा जवान लोभीला पाहण्यासाठी एकटाच येतो. त्यांच्या परिवाराविषयी तो म्हणतो "अवं म्या अगुदरचं सांगितल नव्हं मला सुटी थोड्याच दिसाची हाय. म्या पोरगी पसंत केली की माज नातलग येतील नव्हं?" असे खोटे बोलून लोभीशी विवाह करतो, व काही दिवसातच तो परत येतो व सांगतो "मला सस्पेंड केलेलं हाय, माजं लगीन होत नव्हतं म्हणून तुम्हाला खोटचं सांगितलं आता मला मारा अगर जीतं ठेवा. म्या तुमच्या दारात कुत्र्यावाणी पडून राहीन." (पृ. ४३) अशा फसव्या, बेरकी व्यक्तींचे दर्शन या प्रसंगातून निदर्शनास येते.

प्रामाणिकपणाने काम करणाऱ्या कष्टाळू स्वभावाच्या किसना मागाच्या अगतिक अवस्थेचे दर्शन या कादंबरीत पुढील प्रसंगातून घडते. पाटलाच्या शेतात गुऱ्हाळा असतो. त्या ठिकाणी जाळ घालीत असताना किसना चुलाण्यात अडकतो तो गंभीर जखमी होतो. शेवटी काम करता येत नसल्यामुळे तो फार मोठ्या अपेक्षेने पाटलाकडे जातो त्यावेळी तेथे घडलेला प्रसंग जीवाला चटका लावून जातो.

किसना पाटलानां म्हणतो ‘‘मालक तूमी व्हताव म्हून म्या वाचलो, लय उपकार झालेत!’’

पाटील एक नाही की दोन नाही गप्पाची गप्प.

‘‘मालक घुरपी येत जाईल कामाला!

‘‘चल उतर खाली काय गरज नाही. माज एवढं मोंठ नुकसान केलं. दवाखान्याचा खर्च झाला. आता काय गरज नाय. जा, चालता हो!’’

‘‘मालक, असं करू नका आता म्या कुणाकडं जाऊ?’’

‘‘कुठंबी जा, दुनिया वस पडली नाय.’’ (पृ. ४६)

या प्रसंगातून लेखकानी एका दलित मजूराच्या अवस्थेचे दर्शन व त्याला हाकलून देणाऱ्या पाटलाचे दर्शन घडविले आहे. समाजातील शोषक व शोषित व्यक्तींचे दर्शन या घटनाप्रसंगातून घडते.

राणोजी बनसुड्याला समाज हवा असतो त्याला समाजात घेण्यासाठी जात पंचायतीची बैठक घेतली जाते. त्यावेळी तेथील घडलेल्या प्रसंगातून दलित समाजातील जात पंचायतीचे , रितीरिवाजाचे दर्शन घडते.

जात पंचायतीमधील भाऊराव राणूजीला सांगतात ‘‘पंचायत तुला आमच्या वतनात घ्यायला तयार हाय पर..’’

" पर काय?"

"तूला पंचाची पानसुपारी द्यावी लागल."

"व्हय मायबाप."

"अजून भावकीला जेवण द्यावं लागलं"

या प्रसंगातून लेखकानी दलित समाजातील व्यक्तींच्या रूढी, परंपरा, भावकी याचे नेमकेपणाने दर्शन घडते.

**'धुराळा' मधील प्रसंगनिर्मिती**

लेखकानी सुदामाच्या जीवनाची कर्मकहाणी व त्याचा फटकरीने केलेला घात याचे दाहक चित्रण अनेक घटना, प्रसंगातून 'धुराळा' या कादंबरीत मांडतात. 'धुराळा' ही कादंबरी अनेक घटना, प्रसंगातून साकार झालेली आहे. या कादंबरीत पात्रापेक्षा घटनाप्रसंग अधिक लक्षात राहतात. व्यक्तीरेखाचे हुबेहुब दर्शन घटनाप्रसंगातून नजरेस येते. कादंबरीत ग्रामीण भागातील वास्तवचित्रण तेथील परिसर, सुदामाचा आळशीपणा, मालनचा स्वभाव, फॅक्टरीचा परिसर तेथील निरनिराळे माणसे यांचे यथायोग्य दर्शन घडविण्यासाठी लेखकानी घटनाप्रसंगाचा वापर केला आहे.

सुदामा ज्यावेळी हॉटेल शिवशंकर मध्ये जेव्हा कामाला येतो त्यावेळी हॉटेल मालकाने सुदामाच्या विषयी केलेल्या चौकशीचा प्रसंग प्रत्ययकारी पद्धतीने लेखकानी मांडला आहे. नाव, गाव विचारल्यानंतर हॉटेल मालक त्याला म्हणतो,

"बरं पगार किती घेशील?"

"मालक, तूम्ही कायबी द्या. पोटाला दोन वेळा खायला दिलं तरी पुर झाल!"

अशा वाक्यातून सुदामाच्या अगतिक, लाचार अवस्थेचे दाहक दर्शन घडते. 'घटनाप्रसंग मांडत असताना लेखकांनी कमीतकमी शब्दातून जास्तीत जास्त आशय साध्य करण्याचा प्रयत्न केला आहे. सुदामाच्या मानसिक घालमेलीच्या अवस्थेचे, दबलेल्या मनाचे दर्शन लेखकानी कादंबरीत अविष्कृत केले आहे. सुदामा हॉटेल शिवशंकर मध्ये काम करीत असताना त्याच्याबद्दल बरे वाईट लोक बोलत असतात. त्यामुळे सुदामा मनोमनी सतत नाराज असे. आपल्या भावना कुठतरी मुखर करावी असे त्याला वाटते व एके दिवशी तो एका सायबांसमोर भावना व्यक्त करतो. याबाबतीत त्यांच्या मानसिक अवस्थेविषयीचे दर्शन पुढील विधानातून लेखकांनी घडविले आहे. ''व्हय सायब, मीबी त्याचीच वाट बघत होतो. पण जिवाभावाचं कोणी भेटत नव्हतं, म्हणून सारख्या जडशील शिळा सोसत होतो सायब.'' (पृ. २२) यातून लेखकांनी सुदामाच्या मानसिक अवस्थेचे दर्शन घडविले आहे. सुदामा व मालन यांच्यातील भांडणाचा प्रसंग हा सुदामाची फसवेगिरी निदर्शनास आणतो. गावातून उनाडक्या प्रमाणे फिरणारा सुदामाबद्दल मालनला खूप चिड येते. जेवण्यासाठी आलेल्या सुदामा मालनला म्हणतो 'म्हंजी शेताता कामाला जाणारालाच भूक लागतीय व्हय? मालन म्हणते, ''नाय तर काय शेतात ऊन लागतयं, घाम गळतोय, आन् भूक कडकडून लागतेय.''

''अजून पारावर बसूनबी भूक लागलीय.''

लेखकानी मालन व सुदामा यांच्यातील वाद प्रत्ययकारी पद्धतीने मांडलेला आहे. व सुदामाची फसवेगिरी या वादातून नजरेस येते.

त्रिबंकरावाचा दिखावूपणा लेखकानी कादंबरीत मांडताना त्यांचे हुबेहुब दर्शन पुढील प्रसंगातून घडवितात.

देवाच्या वाडीतील लोक त्रिबंकरावांच्या गळ्यातील लॉकेट पाहून विचारतात,

"केवढ्याच बरं?"

"तीन तोळ्याचं?"

असे सहजपणे सांगणारा त्रिबंकराव फॅक्टरीबद्दल सांगतो,

"अवं सादा गाडीवान पंधरा दिवसात एक तोळ्याची अंगठी करतोय तर आमचं काय नवल?"

या प्रसंगातून देवाच्या वाडीतील लोकांवरती त्रिबंकरावांचा छाप पडतो व हे लोक त्रिबंकरावाच्या भूलथापांना कसे फसतात याचा प्रत्यय या प्रसंगातून लेखक नजरेस आणतात.

फॅक्टरीवरील लोकांच्या कष्टाचे व हलाखीचे दर्शन वाचकाला अस्वस्थ करणारे ठरते. लेखकांनी त्याचे दर्शन नेमकेपणाने करतात.

सगळा हात बारीक पात्यानं चिरावं तसं सगळ्या हातावर चिरकांड्या पडलेल्या आहेत. त्यातून रक्ताळपण दिसतंय, अंग पांढरधोट दिसतंय, दोघेही लपकन चपापले, सगळ्या अंगावर अशा बारीक रेषा उमटलेल्या आहेत. हातावर, पायावर, मांडीवर, रेघांच रेघा अन् त्यातून आता चुरचुरणं सुरू झालेल. अशा प्रत्यक्ष वर्णनातून ऊसतोड कामगाराच्या हालअपेष्टाचे प्रभावी चित्रण कादंबरीत नजरेत येते. त्यामुळे कादंबरी ही प्रभावशाली ठरली आहे. ज्यावेळी मालनवर अतिप्रसंग गब्बरू करतो त्यावेळी तेथे घडलेले नाट्य लेखकानी आपल्या लेखनीने प्रत्यक्ष समोर उभे करतात. सुदामा फडात गेला आहे हे पाहून गब्बरू सुदामाच्या झोपडीकडे येवून झोपडीत जाणार इतक्यात तेथे सुदामा येवून त्याच्यावर वार करतो पण गबरूचा हात तुटतो व गब्बरू पळून जातो असा थरारक प्रसंग लेखकानी साक्षात समोर घडत आहे अशा पद्धतीने रेखाटला आहे. अशा अनेक प्रसंगाची गुंफण करून 'धुराळा' ही कादंबरी परिपूर्ण

बनली आहे. यातील दर्जेदार प्रसंगामुळे ऊसतोडणी कामगारांच्या होणाऱ्या हालअपेष्टांचे अनोखे दर्शन घडते. त्यामुळे 'धुराळा' ही कादंबरी वाचनीय बनते.

## वातावरण निर्मिती

कादंबरीत व्यक्तीचित्रणे, प्रसंगनिर्मिती बरोबरच वातावरण निर्मितीचा सुद्धा महत्वपूर्ण वाटा असतो. कादंबरीतील कथानक व व्यक्तिदर्शन यातील रहस्य उलगडण्यास वातावरणाचा फार उपयोग होतो. कादंबरीच्या कथानकात येणारे निरनिराळे प्रसंग, घटना, व विविध व्यक्तींच्या स्वभावाचे दर्शन घडविण्यासाठी वातावरणनिर्मितीचा फार मोठा उपयोग होतो. वातावरणनिर्मितीमुळे कादंबरीचे कथानक समृद्ध होण्यास मदत होते. कथानकाला वास्तवता प्राप्त होण्यासाठी वातावरणनिर्मितीची आवश्यकता असते. सामाजिक, ऐतिहासिक कादंबरीत वातावरणनिर्मितीला खूप महत्व असते. प्रादेशिक व ग्रामीण कादंबरीत तर वातावरणाला फार महत्वपूर्ण असते. योगीराज वाघमारे यांनी वातावरणनिर्मितीचा योग्य वापर करून 'पडझड' व 'धुराळा' ही कादंबरी प्रभावशाली व जीवंत केली आहेत.

## 'पडझड' ची वातावरणनिर्मिती

'पडझड' या कादंबरीत लेखकानी वातावरणनिर्मिती साधून वाचकासमोर ती घटना प्रत्यक्ष उभे करतात. अनेक बारकाव्याची नोंद टिपून तेथील परिसर राहणीमान यांचे यथार्थ दर्शन घडवितात.

'पडझड' मध्ये सुरूवातीला आलेले वर्णन हे महत्वपूर्ण आहे. ''ऑगस्ट महिन्यातले दिवस भर पावसाळा असूनही पाऊस मनासारखा बरसलेला नव्हता. उडीद – मूग चांगले निसवायचे. सगळीकडे हिरवगार दिसायचं, गुरढोरं चारा खाऊन धष्टपुष्ट दिसायचे. पण यंदा ते दृश्य दिसत नव्हत'' (पृ. ५) असे प्रभावी वर्णन करून लेखकानी तेथील भागाचे प्रत्यक्ष चित्र नजरेसमोर उभे करतात. व वाचकाला गावी जात असताना

येडेश्वरीचा डोंगर पाहिल्यानंतर त्यांच्या मनात बालपणीच्या आठवणी जीवंत होतात. व वाचकाला ते आपल्या बालपणात घेऊन जातात. बालपणी येडेश्वरी डोंगरावरील भटंकतीचा प्रसंग मांडतात. ''दिवाळी पाडव्याला अगर श्रावणी पौर्णिमेला येडेश्वरीला गेलं की सगळा डोंगर आम्ही पालथा घालायचो कार बोर हुडकून खात असू. घोरपडीच्या बिळात काठ्या घालून घोरपड उघड्या मैदानावर आणून तिचा ताना काढण्यात मौज वाटायची. पण मध्येच कुणीतरी म्हणायचं, ''लेकानो, घोरपडीच्या शेपटाचा रपाटा बसला म्हजी माणूस बुळगा होतोय. अशा वर्णनातून लेखकानी आपल्या बालपणीच्या गमती – जमती वाचकांसमोर मांडण्याचा प्रयत्न करतात. अशा पद्धतीने प्रत्येक ठिकाणच्या मागे दडलेल्या आठवणींना उजाळा देतात. दलित समाजातील लोंकाना सुविधापासून कसे वंचित ठेवले जाते. एखादी सुधारणा केल्यास ती कशा स्वरूपाची असते याचे वास्तवचित्रण भीमनगरमधील असणाऱ्या गटारीच्या वर्णनातून नजरेत येते. भीमनगर या दलित वस्तीतील गटारी विषयी चंडू कांबळे म्हणतो ''आपल्या वस्तीत एवढी एकुलती एक गटार आहे. ती विठ्ठलतात्याच्या घरापासून जी निघते ती भगवान कांबळेच्या घराजवळ ओढ्याला मिळते. जास्तीतजास्त पन्नास फुटाच अंतर असेल. एखाद्याही फूट खोल खोदलेल नाही, टिचभर रूंदीची दगडी चिरे न लावलेली, सिमेंटच्या पत्ता नसलेली गटार केवळ खोऱ्यात माती उकरलेली मोरी म्हटल तरी चालेल''. अशा गटारीवर अठरा हजार रूपये खर्च लेखकानी गटारीच्या या वर्णनातून सरकारी खात्यातील भ्रष्ट व्यवस्थेचे चित्रण व दलित वस्तीतील सुधारणा बद्दल सवर्ण समाजाने केलेला दुजाभाव निदर्शनास आणतात.

शेटीबादादा ही व्यक्तीरेखा साकारतं असताना शेटीबादादाच्या लढाईचे वर्णन लेखकानी लढाई समोर घडत आहे अशा पद्धतीने मांडतात. ब्रम्हदेशातील लढाईचे वर्णन मांडतात. ''बर्मात ह्ये दाट जंगल, अंधार किर्र पडलेला. त्यात पावसाची चळक धार, पाय कुठं पडेल त्याचा नेम नाही. आमच्या ग्रुप पुढं निघालेला जवळचा जवान दिसत

नाही. पाठीवर ओझ्र, हातात बंदूक, एकएक इंच सरकत पुढं जायचं, थोडं कुठ खुसफुस झालं की, सावधान पोजीशनमध्ये यायचं घशाला तर कोरड पडलेली... ''अशा वर्णनातून ब्रम्हदेशाचं जंगल व तेथील सैनिकाची शिस्त लेखकानी प्रभावशाली पद्धतीने मांडतात पूर्वीच्या काळी ग्रामीण जीवन समृद्ध होते. पुर्वीच्या काळी वृक्षसंपदा मोठ्या प्रमाणात होती. याचा प्रत्यय लेखकानी 'पडझड' या कादंबरीत घेतला आहे. ''गाव आणि भीमनगर यामध्ये पाटलाचं शेत असायचं, पलीकडे गावतळे, तळ्याच्या कडेला आणि पाटलाच्या शेताच्या बांधावर ही झाडी हाती उंच उंच काळ्या कुळकुळीत बाभळी आणि डेरेदार आंबे, शेताला लागूनच ओढा वाहत असायचा, ओढा असा फार लांबून आलेला नव्हता. बारकुलाच्या शेतातलं पांदीतलं पाणी काढून दिलेला नाला. त्याला येडाईच्या वाटेवरचं पाणी येऊन मिळायचं त्याचाच मोठा लोंढा व्हायचा, तो बामणाच्या शेतातून वाहात येऊन भीमनगरला वरल्या अंगाला येऊन थेट मोठ्या पुलाखाली येऊन भिडायचा.'' (पृष्ठ ३७).

या वर्णनातून पुर्वीच्या काळातील गावातील संपन्न अशा नैसर्गिक संपत्तीचे यथार्थ दर्शन घडवितात व वाचकाला पुर्वीच्या काळात ग्रामीण भागात असणाऱ्या नैसर्गिक संपत्तीची जाणीव करून देतात. कादंबरीत काळानुसार पडझड कशी झाली आहे. सुखी संपन्न गावे आज ओसं कशी पडत आहेत. याचे प्रभावशाली दर्शन घडवतात.

**'धुराळा' मधील वातावरणनिर्मिती**

'धुराळा' या कादंबरीच्या कथानकाला अनुसरून कादंबरीत वातावरणनिर्मिती साधली आहे. ही कादंबरी ग्रामीण भागाचे यथार्थ दर्शन घडविते. त्यामुळे ग्रामीण भागातील परिसर, तेथील व्यक्तीजीवन, त्यांच्या रूढी, परंपरा व फॅक्टरीचा परिसर कादंबरीत जीवंत व प्रभावी होण्यासाठी वातावरणनिर्मितीचा नेमकेपणाने वापर केला

आहे. कादंबरीचा नायक सुदामा हा ज्या हॉटेल शिवशंकर मध्ये कामाला असतो. त्या हॉटेलाचे वर्णन कादंबरीत सुरूवातीस नजरेत येते. 'हॉटेल शिवशंकर' कुडाच्या भिंती, त्यावर पाच पत्रे टाकलेले, त्यात एक लाकडी कपाट, त्यात शेवचिवडा कागदावर पसरवून टाकलेला, भज्यांचे ताट असायचं, एक मोठा ओटा तयार केलेला, त्यावर स्टोव्ह आणि चूल मांडलेली.'' (पृ. १३)

अशा हॉटेलच्या वर्णनातून लेखकानी वाचकाला घटनास्थळी घेवून जातात. व कादंबरीत एकरूप करून घेतात. या वर्णनातून 'हॉटेल शिवशंकर' हे वाचकाच्या समोर उभे करतात.

सुदामा आपल्या कर्मकहानीची सुरवात आपल्या गावच्या चित्रणाने करतो ''देवाची वाडी तशी आडवळणाचीच आहे. तुकाईच्या माळाला मागे सारून दगडगोट्यांच्या वाटेनं दोन चार वळण ओलांडली की आपण देवाच्या वाडीत येतो. हजार दिडहजार वस्तीची देवाचीवाडी. येथील घरच अशी आहेत की, इथं दोन - चार तर तिथ चार - पाच, ना विटांची ना दगडांची. एकावर एक दगडगोटा ठेवायचा, शेणमातीचा लेप द्यायचा अन् त्यावर उतरते छप्पर टाकले की झालं. कुडाची केळांची घरं तर बांधनुकीला फार सोपी.'' (पृ. २३)

लेखकानी केलेले वर्णन अत्यंत सुक्ष्म बारकांव्यासह सुदामाच्या गावाचे दर्शन घडविते व कादंबरी मुख्य कथानकाजवळ जाण्यास मदत होते. उन्हाळ्याच्या दिवसातले उन्हाचे वर्णन लेखकांनी कादंबरीत अविष्कृत केले आहे.

''माळरानावर उन्हाळा खडा व्हायचा, उन्हाची रखरख होऊ लागली सूर्य डोक्यावर आला म्हणजे नांगर, कुळव सुटायचे, बैल आंब्याखाली यायचं, नांगरटीत हुळहुळणारे पाय आणि तापलेल अंग सावलीत आल की थंडगार व्हायचं, दुपारी तीन

– साडेतीन वाजेपर्यंत कोणी दिसायचं नाही लांबच लांब पसरलेलं जमिनीचं काळं पोट त्यावर नांगराने केलेली उसवणं आणि त्यावर उन्हाचे बसणारे सपकारे.'' (पृ. ३३)

अशा रीतीने उन्हाळ्यामुळे दुपारच्यावेळी शेतात माणसाची, जनावरांची वर्दळ कधी कमी असते याचे हुबेहुब वर्णन लेखक करतात. 'पडझड' या कादंबरीत येणाऱ्या वृक्षाची वर्णने सुद्धा कादंबरीस प्रभावशाली बनवतात. मानवी जीवनात वृक्षाना कितपत स्थान आहे. ग्रामीण भागातील लोकाच्या जीवनात वृक्षाचा कितपत सहभाग असतो व त्या वृक्षापाठीमागे किती आठवणी दडल्या असतात यांचा प्रत्यय वडाच्या झाडाच्या वर्णनातून नजरेस येतो.

'माझ्या जन्माच्या अगोदरबी इथे वड असाच व्हता म्हणजे बघा किती उन्हाळं, पावसाळं याने पाहिले असतील! असं उंच आणि मोठं झाडं पंचक्रोशीत नव्हत. बुधवारचा बाजार वडाच्या सावलीत भरायचा.' तेरखेडा, दहिफळचे कासार, आतार अन् कापडवाले रात्री मुक्कामाला वडाखालीच असायचे. वडावर असंख्य पक्षी असायचे शिवारातले सगळे कावळे येथेच राहतात की काय असे वाटायचे आता तो वड बाजारचौकात दिसत नाही. (पृ. ३८). या वर्णनातून लेखकानी वडाच्या माध्यमातून बाजारातील लोक, व्यापारी, पक्षी यांचा निवारा असलेले हे झाड यांचे अत्यंत सुरेख रीतीने वर्णन कादंबरीत नमूद केले आहे. पण हा बाजारचौकातला वड आज दिसत नाही ही उणीव लेखक व्यक्त करतात.

किसना मांग ज्या गुऱ्हाळावर कामाला असतो तेथील गुऱ्हाळाचे वर्णन प्रभावशाली पद्धतीने ते लेखक मांडतात. ''पाकाची तार चालेपर्यंत रस घोटायचा, गूळ चांगला व्हावा म्हणून त्यात भेंडाचा रस ओतायचा, गुळाला चांगला रंग व्हावा म्हणून गुळवे काहीबाही करायचे काहील तयार झाली म्हणजे सात – आठ यायचे एका बाजूने तीन – चार दूसऱ्या बाजूने तीन – चार व्हायचे. लाकडाची दांडकी कढईच्या कानातून

घातली जायची. मग हळूच पण नेटानं रसरसणाऱ्या पाकाची काहिली चुलाण्यावरून उचलायची.'' (पृ. ४५)

लेखकांनी गुळाची काहिली तयार करीत असताना केलेले प्रत्यक्ष चित्रणामुळे वाचकाला प्रत्यक्ष त्या ठिकाणी असल्याचा भास होतो. अशा वेगवेगळ्या वर्णनातून कादंबरी वाचकाला ज्या – त्या वातावरणात नेण्याची क्षमता योगीराज वाघमारे यांच्या लेखनीत आहे. यावरून योगीराज वाघमारे यांच्या लेखनशैलीचे विशेष ठळकपणे जाणवते.

त्रिंबकरावाच्या व्यक्तिरेखेतून त्रिबंकरावाचे व्यक्तिमत्वाची ओळख होते. ''दाढीच खुटं वाढलेली, उलटे केस पाडलेले, चपचप तेल लावलेल हातात कड असलेलं, पट्टयाट्टयाचा अर्ध्या बाह्याचा बुश शर्ट, निळ्या रंगाची पँट, छातीवरची बटन रिकामी, त्यातून छाती दिसत्येय. काळ्या केसांच दाटं जंगल, कानात अत्तराचा फाया, त्याचा घमघमाट पसरलेला, मध्येच सिगारेटचा झुरका घेऊन 'हूपऽऽ करीत आड्याला धूर सोडणारा फसकन हसणारा, आणि कुठल्याही प्रश्नाचं उत्तर आमच्या फॅक्टरीत असं म्हणूनच सुरू व्हायच.'' (पृ. ४०)

त्रिबंकरावाच्या या वर्णनातून ती व्यक्तीरेखा वाचकासमोर उभे करतात. फॅक्टरीतील मुकादमाला शोभेल अशी व्यक्तीरेखा योगीराज वाघमारे यांनी कादंबरीत मांडली आहे. फॅक्टरीजवळ असणाऱ्या वसाहतीचे वर्णन तेथील परिसराचे दर्शन घडविते. ''फॅक्टरीजवळच एक वसाहत स्थापन झालेली होती. फॅक्टरीत काम करणारे, साखरेच्या गोण्या उचलणारे, ट्रक ड्रायव्हर क्लिनर, ट्रॅक्टरवाले, लाईनमन आणि मेकॅनिक अन् त्यांचे कबिले शिवाय डायरेक्टर सभासदांच्या बंगल्यावर काम करणारे शिपाई, माळी, भांडी घासणाऱ्या बाया असं करता करता पाचएक हजाराची वस्ती त्या परिसरात स्थापन झालेली.'' (पृ. ६४)

अशा फॅक्टरीच्या वर्णनातून तेथील जनजीवनाचा आढावा घेतात. फॅक्टरीत काम करणाऱ्या अनेक लोकांचे प्रखर दर्शन घडते. फॅक्टरीच्या साहेबापासून ते भांडी घासणाऱ्या बायकाचा उल्लेख लेखकानी यात केला आहे. कमीत कमी शब्दात जास्तीत जास्त आशय प्रकट करण्याचे सामर्थ्य योगीराज वाघमारे यांच्या लेखनशैलीत आहे. म्हणूनच या वर्णनातून फॅक्टरीचा परिसर जीवंत झाला आहे. सुदामाने गबरूचा हात तोडल्यांनतर, सुदामाची मालनशी गाठभेट होते त्यावेळी तेथील घडलेला प्रसंग लेखक मांडतात. घाबरलेल्या मालनला सुदामा म्हणतो, ''हे बघ घाबरू नगंस, म्या काय वाईट केल नाय, दुसऱ्याच्या इज्जतीवर हात घालणाऱ्याचा म्या हात तोडलाय जीवंच मारणार होतो पण.. '' तसेच ''रडू नगंस धीर धर हे बघ गावच्या माणसाबरोबर गावाकंड जा. पोरीला सांबाळ, म्या कधी ना कधी येणार, म्या काय गुन्हा केला नाय, तरीपण पोलीस मला पकडतील म्या फरार होतो, म्या जातो!'' अशा प्रसंगातून लेखकानी केलेली तेथील वातावरणनिर्मिती निदर्शनास येते. व वाचकास अस्वस्थ करून जाते. अशा अनेक प्रसंगाची मांडणी 'पडझड' या कादंबरीत आल्याने या कादंबरीला महत्वपूर्ण दर्जा प्राप्त होतो.

## निवेदन पद्धती

कादंबरी हा निवेदनप्रधान वाङ्मयप्रकार आहे. निवेदनपद्धतीचा वापर विषयानुरूप कसा करावा ही गोष्ट कादंबरीकारावर अवलंबून आहे. कादंबरीतून जो आशय व्यक्त केला जातो. त्याच्या आवश्यकतेनुसार लेखक निवेदन पद्धतीचा उपयोग करीत असतो. कादंबरीत घटनाप्रसंग, वातावरण निर्मितीसाठी निवेदकाची गरज असते. कादंबरीत निवेदकाचे निवेदन हे महत्वपूर्ण असते. त्या निवेदनावरतीच कादंबरी अवलंबून असते.

कांदबरीच्या इतर घटकाबरोबरच निवेदन हा घटक कादंबरीला गुणात्मक दर्जा प्राप्त करून देतो. कथानकाची किंवा घटनेची परिणामकारकता वाढविण्यासाठी निवेदक

आवश्यक असतो. व्यक्तिचित्रणाच्या प्रभावी दर्शनासाठी कादंबरीत निवेदन महत्वपूर्ण ठरत असते. निवेदनामधून मानवी मनाचा आणि त्यांच्या स्वभावाचा वेध घेता येतो.

निवेदन हे प्रथमपुरूषी, तृतीयपुरूषी पत्रात्मक, मनोविश्लेषणात्मक इत्यादी पद्धतीने कादंबरीत अवतरते. प्रथमपुरूषी निवेदनात निवेदकाच्या चिंतनाला अंतर्मुखतेला अधिक वाव असतो. तृतीयपुरूषी निवेदनशैलीमध्ये लेखकाला तटस्थपणे वर्णन करता येते. विविध पात्रांच्या मनातील भावभावनांचे दर्शन घडविता येते. निवेदकास व्यक्तीच्या बाह्यांगावर व अंतरंगावर प्रकाश टाकता येतो. तसेच पत्रात्मक कथा आत्मनिरूपणापेक्षा आत्मनिरूपण अधिक पद्धतीमध्ये असते. अशा निरनिराळ्या निवेदनपद्धतीचा वापर करून कादंबऱ्या निर्माण होतात.

**'पडझड' मधील निवेदनपद्धती**

'पडझड' या कादंबरीत लेखकानी प्रथम पुरूषी निवेदनपद्धती चा वापर केला आहे. 'पडझड' या कादंबरीत निवेदक अनेक व्यक्तिच्या व्यथा, तेथील लोकजीवन, भीमनगर व साठेनगर यांच्यात झालेला बदल. लोकांची बदललेली मानसिकता, लोकाच्या नैतिकतेची पडझड व दलितांच्या व्यथा वेदनांचे प्रत्ययकारी दर्शन घडवतो. 'पडझड' कादंबरीतील व्यक्तिरेखांचे वर्णनामुळे व्यक्तीचे हाव-भाव, भावना, लकब, पोषाख, बोलणे यासारख्या अनेक गोष्टीचा उल्लेख निवेदनामुळे होतो. एखाद्या घटनेचे किंवा, वातावरणाचे वर्णन करताना योगीराज वाघमारे यांनी निवेदनातून तो घटनाप्रसंग किंवा वातावरणनिर्मिती प्रत्यक्ष नजरेसमोर उभे करतात. मारूती मांगाच्या मनात पाटलाबद्दल असणारा राग, लेखक कादंबरीत मांडतात. "पाटलाचं चांगल व्हायचं नाय, चांगल्या मरणानं मरायचा नाही, गरिबाच्या तोंडचा घास काढला". पात्रांच्या मनातील राग अगदी प्रभावीपणे लेखक मांडतात. मारूतीच्या मनातील कोंडलेल्या दबलेल्या मनाचे हुंकार प्रभावीपणे प्रकट होताना दिसतात. 'पडझड' या कादंबरीत बारीक -

सारीक तपशीलांचा भरणा करून लेखकानी भीमनगर  व साठेनगर मधील व्यक्तीरेखा जीवंत केल्या आहेत. सिद्धार्थ पांडागळे या तरूणाची लेखकांनी वर्णन करून व्यक्तीरेखा प्रत्यक्ष वाचकासमोर उभे करतात.

''मळके कपडे, इनशर्ट केलेले, केसांची झुलपे दाढी वाढलेली, काखेत शबनम बॅग, उजव्या हातात एक जाडजूड फाईल, डाव्या हातात वर्तमानपत्राची गुंडाळी'' या बारीक - सारीक वर्णनातून सिद्धार्थ पांडागळे या तरूणाची अवस्था निदर्शनास आणतात. योगीराज वाघमारे यांचे लेखन मानवी मनाचा वेध घेताना दिसते 'पडझड' या कादंबरीत दलित समाजातील लोकांच्या भाव - भावनांचे दर्शन घडविले आहे. सवर्ण समाजाकडून दलित लोकांचे कसे शोषण केले जाते यांचा प्रत्यय 'पडझड' या कादंबरीतून नजरेस येतो. योगीराज वाघमारे यांनी 'पडझड' मध्ये झाडे, डोंगर, वस्ती, यासारख्या ग्रामीण भागातील घटकाचे हूबेहूब वर्णन करून येरमाळ्याच्या परिसर कादंबरीत जीवंत केला आहे. या वर्णनामुळे कादंबरीला एक अनोखे सौदंर्य प्राप्त झाले आहे. लेखकाची निवेदनपद्धती बोलीशी जवळची नाते सांगणारी आहे. त्यामुळे ती वैशिष्ट्यपूर्ण ठरते.

## 'धुराळा' मधील निवेदनपद्धती

'धुराळा' या कादंबरीतील निवेदन तृतीयपुरूषी आहे. 'धुराळा' या कादंबरीत ऊसतोडणी कामगाराच्या हाल अपेष्टाचे चित्रण आले. त्यामुळे 'धुराळा' या कादंबरीच्या कथानकाला अनुसरून निवेदन आले आहे. 'धुराळा' या कादंबरीचा नायक सुदामा आहे. त्यांच्या आयुष्याची कर्मकहाणी या कादंबरीत चित्रित झाली आहे. सुदामाच्या मनातील व्यथा लेखकानी आपल्या शब्दात पकडून त्याचे दाहक चित्रण 'धुराळा' या कादंबरीतून घडवतात. ज्यावेळी हॉटेल मालक सुदामाला गाढव म्हणतो त्यावेळी सुदामाच्या मानसिक अवस्थेचे दर्शन लेखक मांडतात. ''दुखतं-खुपतं म्हणून सांगितलं

नाय पर आज जराशी हसलो तर त्यांच्या असा दणका. आयला ह्या जन्माचा काय बी उपेग नाय?'' अशा पद्धतीने लेखकानी सुदामाच्या मनाचे प्रत्ययकारी दर्शन घडवितात. 'धुराळा' या कादंबरीत न येणारी निवेदने ही प्रत्ययकारी, वास्तववादी, व संयमीत आहेत. फॅक्टरीवरील परिसर लेखकानी निवेदनातून जीवंत केला आहे. ''नजर फिरेल तिथपर्यंत चाळीच चाळीच होत्या. पत्रे ठोकून उभारलेली घर, त्याला पत्र्यांचेच दार, पत्र्याचीच खिडकी, खुज्यां घरातून माणसं, बाया, लेकरं आत-बाहेर करायची, बारकी पोरं रस्त्यावर अगर गटारावर शी ला बसलेली''. अशा वर्णनातून फॅक्टरीचा परिसर वाचकासमोर उभा करतात. यातून त्यांची निवेदनशैली कितपत प्रभावी आहे यांचे दर्शन घडते तसेच वेगवेगळ्या पात्रानुसार लेखकाची निवेदनशैली बदलत असते. चिच्या आपल्या मुसलमानी मराठी या मिश्र भाषेचा वापर करून गिऱ्हाइकांशी बोलताना दिसून येते. त्यामूळे ती व्यक्तिरेखा अधिक प्रभावी होते. ऊस तोडणी कामगारांच्या समस्येला वाचकांसमोर उभे करण्याचे सामर्थ्य लेखकाच्या निवेदनशैलीत आहे. लेखकानी निवेदनशैलीत ही पाल्हाळीक व काल्पनिक नाही तसेच ती फापटपसारा ही करीत नाही. अगदी अचूक अशी निवेदनशैली 'धुराळा' या कादंबरीत नजरेत येते. अगदी कमी शब्दाचा वापर करून जास्तीत जास्त आशय प्रकट करण्याची क्षमता, योगीराज वाघमारे यांच्या 'धुराळा' या कादंबरीतून निवेदनशैलीत आहे.

**भाषाशैली**

'पडझड' आणि 'धुराळा' या योगीराज वाघमारे यांच्या कादंबऱ्याच्या भाषाशैलीचा विचार इथे करावयाचा आहे. कादबंरीमध्ये भाषाशैलीला महत्वपूर्ण स्थान असते. मानवी जीवनाचे आणि मानवी स्वभावाचे चित्रण लेखक कादंबरीत अविष्कृत करीत असतो.प्रत्येक साहित्यकृती ही भाषेच्या माध्यमातूनच व्यक्त होत असते. त्यामुळे प्रत्येक लेखक वेगवेगळी साहित्यकृती निर्माण करीत असतांना वेगवेगळया

भाषाद्वारे ती कलाकृती सजवीत असतो. भाषेची दोन रूपे आहेत एक म्हणजे प्रमाणभाषा व दूसरी बोलीभाषा , साहित्यामध्ये या दोन्हीही प्रकारचा अवलंब लेखक करित असतो.

भाषेच्या साहायानेच कोणतीही साहित्यकृती आकारास येत असते. भाषा हे साहित्याचे माध्यम आहे. या बाबत बापट व गोडबोले म्हणतात की, ''विचार व भावना शब्दांच्याद्वारे व्यक्त करण्याचे माध्यम हे भाषेचे कार्य असते.''[२] त्यामुळेच भाषेला अन्ययसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. प्रत्येक साहित्यकृतीच्या अभिव्यक्तीनुसार साहित्याची भाषा बदलत जाते. यामुळेच कवितेसारखी कादंबरीची भाषा नसते. तर कादंबरीची भाषा नाटकासारखी नसते. अशा साहित्याच्या भाषेत कालतत्वाबरोबरच चिरतंनतत्व असते. अशा या साहित्यकृतीला भाषेमुळे एक वेगळेपण प्राप्त होते. कादंबरीच्या भाषेविषयी भालचंद्र नेमाडे म्हणतात की, ''कादंबरीची भाषिक व्यवस्था भरड, शिथिल , प्रदीर्घ, इतर पात्रे, कथानक इत्यादी दुसऱ्या व्यवस्थाना सामावून घेणारी भाषिक अवकाश किती लांब किती आखूड, ही कसोटी प्रत्येक साहित्यप्रकार कसोशीने पाळतो यावरुन वाचकाच्या मनात भाषिक अवकाश निर्माण करण्यासाठी कादंबरीत भाषेचा वापर केला जातो हे स्पष्ट होते.''[३] कादंबरीची भाषा ही जितकी साधी, सोपी, घरगुती व प्रासादिक असेल तितके तिचे स्वरुप रमणीय व आकर्षक होईल, ती अलंकृत असावी पण क्लिष्ट व बोजड नसावी. कादंबरीच्या भाषेबद्दल प्रा. जान्हवी संत म्हणतात की, ''भाषा ही अर्थवाही व सुचक पाहिजे तिला थोडक्यात मोठा आशय व्यक्त करता आला पाहिजे. पात्रे व प्रसंग डोळयासमोर उभे करण्याचे त्यात सामर्थ्य पाहिजे.''[४] यावरून कादंबरीच्या यशस्वीतेसाठी भाषा हे माध्यम अनेक दुष्टिकोनातून महत्वपूर्ण ठरीत असते. तसेच कादंबरीतील कथानकाच्या मांडणीला, पात्रांच्या स्वभावपरिपोषाला, प्रसंगाच्या उभारणीला, आणि वातावरणाच्या निर्मितीला

भाषाशैलीमुळे महत्व प्राप्त होते. पण या शैलचि स्वरूप प्रत्येक लेखकाच्या लेखनशैलीवर त्यांच्या व्यक्तीमत्वावर अवलंबून असते. म्हणजेच प्रत्येक लेखकाची भाषाशैली ही वेगवेगळया स्वरूपाची असते. त्याच्या या वेगळया शैलीमुळेच तो कादंबरीकार महत्वपूर्ण ठरीत असतो. पण वेगवेगळया लेखकाच्या व्यक्तिमत्वावर भाषाशैली अवलंबून असली तरी तिला काही समान अशी तत्वे आहेत. त्याबाबतीत ना.सी.फडके यांनी म्हटल्याप्रमाणे ज्याप्रमाणे प्रसंगाशी त्या प्रमाणेच जे पात्रे बोलत असेल त्यांच्या व्यक्तिवैशिष्टयाशी भाषेचे संवादित्व राखले पाहिजे. यावरुन काही प्रमाणात समान अशा तत्वाचाही वापर केला जातो हे समजते तसेच कादंबरीतून फक्त विचारच व्यक्त होत नसतात तर भावनांचे वर्णन ही करावयाचे असते. त्यामुळे त्याला अनुरूप करायचे अशी शब्दाची योजना करावी लागते. मनातील भावना सहजपणे व्यक्त करणे हे खूप कठीण काम आहे. त्यासाठी शब्दाची निवड, वाक्यप्रचार, म्हणी इत्यादीचा वापर करणे आवश्यक आहे. या भाषिक योजनेबाबत भालचंद्र नेमाडे आपले मत नोंदवितात, ''रूपक, प्रतिक, प्रतिमा आणि प्राकृकथा या चारही भाषिक योजना भाषेच्या अंग स्तरावर उगम पावणाऱ्या विविध अर्थ छटांचे संलग्नीकरण करताना दिसतात''[५]

कादंबरीत अनेक पाने असतात. त्या पानाच्या भाषेचे निराळेपण कादंबरीकाराला आपल्या शब्दसामर्थ्यादूवारे चित्रित करायचे असते. यासाठी कादंबरीकाराला निवेदनाची भाषा व संवादाची भाषा याप्रमाणे योग्य वापर करावा लागतो . यादृष्टीने पडझड व धुराळा या कादंबरीतील निवेदनाची भाषा , संवादाची भाषा तसेच इतर घटकाच्या आधारे पाहणे उचित ठरते.

**'पडझड' ची भाषा शैली**

पुढील घटकांच्या आधारे 'पडझड' या कादंबरीच्या भाषाशैलीचा अभ्यास करणे उचित ठरते.

**पडझड ची निवेदनाची भाषा**

योगीराज वाघमारे यांच्या कादंबऱ्याचे यश जसे त्यातील व्यक्तिचित्रणे व प्रसंगचित्रणे यावर आधारलेले आहे. तसे त्यांच्या भाषाशैलीवरही आधारलेले आहे. कोणताही प्रसंग अथवा व्यक्तिरेखा असो योगीराज वाघमारे यांनी अगदी प्रभावीपणाने आपल्यासमोर तो उभा केला आहे. याचे वैशिष्ट्य म्हणजे वाघमारे यांची भाषाशैली होय योगीराज वाघमारे यांनी पडझड या कादंबरीत नागरी आणि ग्रामीण अशा दोन्ही प्रकारच्या भाषेचा संगम केला आहे. पडझड मध्ये निवेदनाची भाषा ही प्रमाणभाषा व लातूर व सोलापूरच्या सिमारेषेवर बोलली जाणारी बोलीभाषा यांचा वापर करून कादंबरीत आलेले आहे. यासाठी लेखकानी दिलेले निवेदन पाहुया.

उदा.:- दिवाळी पाडव्याला अगर श्रावणी पौर्णिमेला येडेश्वरीला गेलं की सगळा डोंगर आम्ही पालथा घालायचो. कारं बोरं हुडकून खात असू. घोरपडीच्या बिळात काठया घालून घोरपड उघडया मैदानावर आणून तिचा ताना काढण्यात मौज वाटायची पण मध्येच कुणीतरी म्हणायंच "लेकानो, घोरपडीचा शेपटाचा रपाटा बसला म्हंजी माणूस बुळगा होतोय". (पृ. १५) एके दिवशी तो बळेबळेच घराबाहेर पडला. (पृ. २४) गावोगाव शिवार बोडकं झाल (पृ. ५७) पोर पिसाळून जायची (पृ. ६९) या निवेदनातून पडझड या कादंबरीत ग्रामीण व नागरी स्वरूपाचे निवेदन निर्दशनास येते. अशाप्रकारे लेखकाची निवेदनाची भाषा साधी सरळ स्वरूपाची आहे. त्यामुळेच कादंबरी वाचनीय बनते.

**संवादाची भाषा**

योगीराज वाघमारे यांची पडझड ही कादंबरी पात्रांच्या मनातील चीड, प्रक्षोभ, असहायता यासारखे निरनिराळया प्रकारचे भाव वर्णन करीत न बसता ते संवादातून प्रकट करते. एखादी घटना मांडताना तेथील नाटय व संघर्ष वेगवेगळया पात्रांच्या तोंडच्या उद्‌गारांद्वारे ते प्रभावीपणाने मांडतात.

योगीराज वाघमारे यांनी कादंबरीला जीवंत करण्यासाठी पात्राच्या तोंडी ग्रामीण बोलीचा वापर केला आहे. त्यामुळे पडझड ही कादंबरी दर्जेदार व महत्वपूर्ण ठरते. योगीराज वाघमारे यांनी पडझड या कादंबरीत निवेदन मांडीत असताना पात्राच्या तोंडी त्या त्या प्रकारचे संवाद व्यक्तीनुसार मांडलेले आहेत. त्यामुळे पडझड ही कादंबरी अधिक अर्थपूर्ण गतीमान व जिवंत बनली आहे. लेखकानी घटनाप्रमाणे संवादाची लांबी कमी जास्त राखली आहे. यासाठी काही पडझड मधील संवाद पाहूया.

**लेखक व नागनाथ तात्या यामधील संवाद**

लेखक ज्यावेळी सत्काराच्या निमित्ताने गावी येतात त्यावेळी भीमनगरमध्ये असणारे वयस्कर असे नागनाथतात्या त्यांना भेटतात त्यावेळी तेथे घडलेला संवाद

"काय रं पोरानु, कसलं गोंधुळ?"

"नाय बाबा"

"तात्या मला ओळखंल का?"

"कोण बाबा? नवा दिसतोय!"

मी आणखीन जवळ गेलो.

"छ्या छ्या, आता कुठलं वळकायला?"

मी नाव सांगितलं.

"कोन?"

"होय."

"म्हंजी, देवराम भावजीचा लेक?"

"हा."

"आरं बाबा, लय दिसा वाट वाकडी केली?" (पृ. १८)

**सीताराम व एस. आर. पीचा जवान यामधील संवाद**

सीताराम त्या जवानास म्हणतो,

"पावणं!"

"जी"

" तुमांला भाव, चुलता, मामा कुणी असंल नव्हं?"

" हायत!"

" मग एकटंच पोरगी बगायला कसं आलावं?"

" अवं म्या अगुदरच सांगितल नव्हं. मला सुटी थोडयाच दिसाची हाय म्या पोरगी पसंत केली की माज नातलग येतील नव्हं?"

" असं, असं तेबी खरंच हाय." (पृ. क्र. ४२)

**किसना मांग व थोरले पाटील याच्यांतील संवाद**

" मालक, तुमी व्हताव म्हून म्या वाचलो. लय उपकार झालेत!"

पाटील एक नाही की दोन नाही, गप्पाची गप्प.

" मालक, धुरपी येत जाईल कामाला!"

" चल, उतर खाली काय गरज नाही, माजं एवढं मोठ नुकसान केल. दवाखान्याचा खर्च झाला. आता काय गरज नाय. जा, चालता हो.!"

" मालक, असं करू नका, आता म्या कुणाकडं जाऊ?"

" कुठंबी जा, दुनिया वस पडली नाय."(पृ. क्र. ४६)

**सिध्दार्थ पांडागळे व चंदू याच्यांमधील संवाद**

" हू इज धीज जंटलमन?"

" तूम्ही ओळखत नाही?"

" नो सर, एक्सक्यूज मी. मी ओळखलं नाही आपणाला."

" हे म्हणजे आपल्या गावचे." चंदून माझं नाव सांगितलं.

" ओ व्हाट अ वंडर! आय एम व्हेरी हॅपी टू मीट यू सर."

(पृ. क्र. ६५, ६६)

" पडझड" मधील संवाद हे बोलके वाटतात. संवादामुळे पडझडमधील व्यक्तिरेखा अधिक जिवंत वाटतात. प्रत्येक पात्रांची मनोव्यथा ही प्रकट होते. प्रत्येक पात्रानुसार संवाद बदलतात.

**निवेदनात छोटी - छोटी वाक्ये**

योगीराज वाघमारे यांनी "पडझड" या कादंबरीतील घटनाप्रसंग, व्यक्तिरेखा, व वातावरणनिर्मितीसाठी छोटया - छोटया वाक्याचा वापर करून ती अधिक वाचनीय केली आहे. व कादंबरीच्या कथानकाला गतिमानता प्राप्त करून दिले आहे. तसेच छोटया-छोटया वाक्यामुळे कादंबरीला नेमकेपणा प्राप्त झालेला आहे व कादंबरीची पणिामकारकता वाढविली आहे.

**उदा.** पिराजीराव पाटलाच्या घरच्या परिस्थितीचे दर्शन लेखक छोटया - छोटया वाक्यातून घडवितात.

वाडा मोडकळीस आलेला, गठीची पांढरी माती विकून आतापर्यंत भावकी खात होती. पण पिराजीराव पोलिस पाटील झाल्यापासून दिवस बरे आले होते. त्यांचा रूबाब वाढला होता. गोरगरिबावर दडपण आणायचं. त्या दडपणातच त्यांचा जन्म चाललेला, वाडयाचे चिरे ढासळलेले, मागची बाजू कोसळलेली, आठ खण त्यांच्या वाटयाला आलेले. त्याच माळवदात पोलीस पाटील राहायचे. त्यांची दोन पोरं शाळा शिकत असलेली, थोरली मुलगी लग्नाला आलेली. अजून कुठं जुळत नाही. (पृ. २५)

सिध्दार्थ या दलित पॅथरच्या नेत्याची दुर्दशा कशी होते याचे चित्रण या वाक्यातून समजते.

“सिध्दार्थ पांडागळे. सेवानिवृत्त गुरूजीचा मुलगा. औरंगाबादला शिकायला होता. दलित पॅंथरमध्ये उडी घेतली. नामांतराच्या चळवळीत पोलिसांचा मार खाल्ला. पुढं तुरूंगवासही झाला. कॉलेज सुटलं. अभ्यास बुडाला.” (पृ. क्र. ६६)

**दर्शनात्मक पध्दती**

“पडझड” या कादंबरीत लेखकानी प्रसंग असो किंवा निवेदन यातून घडणारे ग्रामीण दर्शन वाचकासमोर प्रत्यक्ष उभे केले आहे. ही त्यांची वैशिष्टयपूर्ण शैली ठरते.

उदा. “गाव बदललं होत. खूप विस्तारलेलं होतं. नव्या इमारती, हॉटेल्स, भांडयाची दुकानं, स्टेट बॅंक, भूविकास बॅंक आणि कनिष्ठ महाविदयालय निघालेलं होतं. मारूती कार, ऑटोरिक्षा आणि धडधडत जाणारी ट्रॅक्टर्स दिसत होते. गावात झालेली सुधारणा दिसत होती. (पृ. ७५)

या निवेदनातून लेखकानी आपल्या गावात झालेला बदल वाचकासमोर उभा केला आहे. अशी प्रभावी लेखनशैली कादंबरीला यश प्राप्त करून देण्यास महत्वपूर्ण ठरते.

**वर्णनात्मक पध्दती**

योगीराज वाघमारे यांनी कमीत कमी वर्णनातून एखादी व्यक्तिरेखा कशी साकार करायची याचा प्रत्यय “पडझड” या कादंबरीत पाहावयास मिळतो.

उदा. काळा, बुटका, मिशांचे आकडे असलेला मारूती धिप्पाड दिसायचा. इतरांसारखं तो धोतर अगर अंगरखा घालायचा नाही. हाफ पॅंट अन् मळकं बनियन घालून तो फिरायचा. कधीतरीच त्यांच्या अंगावर चट्ट्यापट्ट्याचा अंगरखा असायचा. गळयात फरीदबाबांचा ताईत. डोईचे केस लांब. त्याला तेल कधी नसायचं. मध्यभागी फाटलेली टोपी, त्यातून दिसणारे केस. पानाचा तोबराभरेलं तोंड. तांबूस डोळे. (पृ.२०)

या वर्णनातून मारूती मांगाची व्यक्तिरेखा वाचकासमोर प्रत्यक्ष उभी राहते. लेखकानी व्यक्तिरेखा, घटनाप्रसंग, निसर्गचित्रणे यांची वर्णने “पडझड” या कादंबरीत जीवंत केली आहेत.

**निवेदनात सादशब्दाचा वापर**

"पडझड" या कादंबरीत ग्रामीण भागातील काही शब्दांना लागून येणारे शब्द हे कादंबरीत महत्वपूर्ण ठरतात. लेखकानी त्या भागातील सादशब्दाचा वापर "पडझड" या कादंबरीत केला आहे.

उदा:- 'रेडिओ अन् फेडिओ' (पृ. १२), 'कवा बवा' (पृ. १२) 'खुरपन-टुरपन'(पृ.४३), 'खळी-दळी' (पृ. ४४), 'मात्र-सोत्र'(पृ. ४४), 'काही-बाही' (पृ.४५), 'इकडे-तिकडे' (पृ. ४६), 'पोरसोरं' (पृ. ४८), 'म्हातारे-कोतारे' (पृ.५७), 'काम-धाम' (पृ. ६३), 'गमती-जमती' (पृ. ७२) या शुब्दामुळे कादंबरीतील पात्राची कृती, लकब, वागणं, ढब ठळकपणे नजरेस येतात.

**प्रतिमाचा वापर**

योगीराज वाघमारे यांनी 'पडझड' या कादंबरीत काही प्रतिमाचा वापर करून कादंबरी समृध्द केली आहे. प्रतिमामुळे घटनाप्रसंग, पात्रांचा स्वभाव अगदी अर्थपूर्ण होतो. त्यामुळे कादंबरी वाचनीय होते. 'पडझड' या कादंबरीत येणाऱ्या काही प्रतिमा पाहूया.

**उदा.** – "माणसं चातकासारखी पावसाची वाट बघायची" (पृ. ५)

"माणसं चाट पडायची"(पृ. २१)

"मावशी फाटक्या आभाळाला दोरा लावण्याचा प्रयत्न करायची."(पृ. २२)

"तिचं बापुडवाणं रूप बघितलं की करूणा यायची."(पृ. २३)

"मारत्याचा जींव घाबराघुबरा झाला."(पृ. २५)

" बिस्किटाच्या रूपाने आलेलं विष आपण बाहेर काढून टाकलं."(पृ. २६)

" माणसं लखकन हलली."(पृ. ३०)

"नानाचा चेहरा मोहरला."(पृ. ३६)

याप्रकारे लेखकानी कादंबरीत प्रतिमाचा वापर करून पात्राची मानसिक स्थिती, व्यक्तिचित्रणे प्रभावी करण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचबरोबर अनुभवातील गुढता व्यक्त करण्यासाठी सुध्दा या प्रतिमाचा वापर महत्वपूर्ण ठरतो.

**उपमाचा वापर**

'पडझड' या कादंबरीत वापरण्यात आलेल्या उपमा ही महत्वपूर्ण ठरतात. उपमामुळे तेथील व्यक्तिचित्रणे, प्रसंग यांच्यातील परिणामकारकता वाढवण्यास मदत होते.

**उदा.** – ''सरीवर सरी घातल्यासारख्या दऱ्या दिसायच्च्या.''(पृ. १५)

'' बगळे, राघू, कावळे उडाले की आकाशात पांढऱ्या-हिरव्या-काळया रंगांच्या रिबिनी सोडल्यासारखं वाटायच.''(पृ. १५)

'' घामाघूम झालेला काळा मारूती रेडयासारखा दिसायचा.''(पृ. २१)

'' मावशी म्हणजे गरीब गाय अन् कामाची खाण.''(पृ. २२)

'' शकुंतला भुतासारखी दिसायची.''(पृ. २३)

'' पोलिसपाटील महाबिलंदर.''(पृ. २५)

'' गाव चोहो दिशेनं हातपाय पसरत आहे.''(पृ. २८)

'' सोन्यासारखी माणसं ''(पृ. ३२)

'' विमानांनी गावावर झडप घातली आहे.''(पृ. ३८)

'' वडाला त्यावेळी कापसाची बोंड आल्यासारखं वाटायचं.''(पृ. ३८)

'' म्या तुमच्या दारात कुत्र्यावाणी पडून राहीन.''(पृ. ४३)

**निवेदनात वाक्यप्रचाराचा वापर**

योगीराज वाघमारे यांनी 'पडझड' या कादंबरीत प्रतिमा, उपमा यांच्याबरोबर वाक्यप्रचाराचा केलेला वापर ही कादंबरीत महत्वपूर्ण ठरतो. ग्रामीण भागात अस्सल गावरान शब्दाचा वापर करून त्यांची कादंबरी सजली आहे. तसेच ग्रामीण भागातील

वापरली जाणारी भाषा व तेथील वातावरण यांची सांगड घालून त्यांनी वाक्यप्रचाराचा वापर करून कादंबरी वाचनीय केली आहे. वाक्यप्रचारामुळे त्याच्या कादंबरीला जीवंतपणा प्राप्त झाला आहे. व ती प्रभावी ठरते, पात्रांच्या मानसिक स्थितीचे दर्शन घडविण्यासाठी वाक्यप्रचाराचा वापर महत्वपूर्ण ठरतो. 'पडझड' या कादंबरीत येणारे काही वाक्यप्रचार पाहूया.

उदा. – "पोरानं पांग फेडलं!"(पृ. १०)

"हातचं टाकून पळत्याच्या मागं लागू नये." (पृ. ११)

"मग आपणाला मेल्याहून मेल्यासारख होईल." (पृ. १७)

"चुलतीनं मिठाचा खडा टाकला." (पृ. ३४)

"परपंचाला बिब्बा लावून टाकला."(पृ. ३४)

"घर चालवायचं म्हणजे नाकी नऊ यायचे." (पृ. ४२)

"बाजीला गरगरून आलं."(पृ. ४३)

असे वाक्यप्रचार कादंबरीत आले आहेत. वाक्यप्रचारामुळे पात्रांचे स्वभाव विशेष अधिक ठसठशीत होतात व फार मोठा भावनिक अर्थ त्यातून व्यक्त होताना दिसतो.

**शिव्याचा वापर**

ग्रामीण भागातील बोलीभाषेचा वापर ज्याप्रमाणे लेखकानी 'पडझड' या कादंबरीत केला आहे. त्याचप्रमाणे तेथील अस्सल गावरान शिव्याचा वापर कादंबरीत केला आहे. त्यामुळे ही कादंबरी ग्रामीण भागाचे दर्शन घडविण्यास महत्वपूर्ण ठरते व ती दर्जेदार ठरते. कादंबरीतील पात्रांच्या तोंडी या शिव्याचा वापर सहजपणे आलेला दिसतो.

**उदा.** "ऊठ भडव्या!" (पृ. २६) "ऊठ साल्या" (पृ. २६)

"त्याच्या तोडांत कीडं पडतील!" (पृ. ६१)

"गप्प वांझुटे, तुला का लेकरं व्हतेत?" (पृ. ६३)

"गांडू आहात!" (पृ. ६८)

**ध्वनीदर्शक शब्दांचा वापर**

ध्वनीदर्शक शब्दांचा वापर करून लेखकानी कादंबरीच्या कथानकाला गतीमानता प्राप्त करून दिली आहे. ध्वनीदर्शक शब्द हे कादंबरीत पात्रांशी, घटनाशी, वातावरणाशी एकरूप झालेली दिसतात.

**उदा.** "एन.सी.सी. चे बूट घातल्यानं खाटखाट आवाज यायचा." (पृ. १४)

"घाट चढताना गाडी रो रो करीत होती."(पृ. १५)

"तळयाच्या लंव्हाळयात ध्यानमग्न बसलेले बगळे म्हशींचा कळप आला की चुबक चुबक करीत उडायचे." (पृ. ३८)

"आम्ही खो खो करून हसायचो." (पृ. ४०)

"ओढा खळखळ वाहायचा ." (पृ. ४८)

"पाऊस धो धो पडायचा." (पृ. ५६)

वरील वाक्यातील अधोरेखीत केलेल्या शब्दातून ध्वनीदर्शक शब्दांचा प्रत्यय येतो.

**ग्रामीण बोलीतील शब्दांचा वापर**

'पडझड' या कादंबरीत येरमाळा या गावाचे दर्शन घडते. त्यामुळे तेथील ग्रामीण बोली भाषेतील शब्दांचा वापर या कादंबरीत आलेला आढळतो. ग्रामीण बोलीतील शब्द हे नागरी भाषेपेक्षा ओबड धोबड वाटत असले तरी तिच्यातला स्वाभाविकपणा वेधक असतो. नागर भाषेतल्या पानभर वर्णनाने जे साध्य होणार नाही ते कार्य ग्रामीण भाषेतल्या एखादया पात्रांच्या तोंडी शब्दाकरवी साध्य होते. यामुळेच 'पडझड' या कादंबरीत आलेले ग्रामीण शब्द महत्वपूर्ण वाटतात.

**उदा.** "कांडका" (पृ. ११), " ताना", "रपाटा" (पृ. १५) "रपदिशी " (पृ. १५),

"जित्राब" (पृ. २१), "खिंडार"(पृ. २१), "गवरीखांड"(पृ. ३२), "गोम" (पृ.३४), "जोगता", नत्क (पृ. ३५), "जंजाळ" (पृ. ३७), "कुपाटी"(पृ. ३९) इ. असे खास बोलीभाषेतील शब्द 'पडझड' या कादंबरीत आलेले आहेत.

**इंग्रजी शब्दाचा वापर**

'पडझड' मध्ये निवेदनाच्या व संवादाच्या माध्यमातून अनेक इंग्रजी शब्द या कादंबरीत आलेले आहेत. मराठीमध्ये रूढ झालेले अनेक इंग्रजी शब्द कादंबरीत येताना दिसतात.

उदा. "बेल" (पृ. ६), "प्रमोशन", "आयडिया" (पृ. ७), "ट्रॅन्झिस्टर"(पृ. १२), "कॅलेंडर", "ड्रेस", "ब्रश", "कन्सेशन" (पृ. १४), "अॅक्शंन!"(पृ. १६), "पॅसेंजर"(पृ. १७), "मॅट्रिक", "स्टोरी" (पृ.२९), "क्लायमेक्स", "अॅक्सिडेंट", (पृ. २७) "कॅनव्हास" "स्टिक", "अटेंशन!" (पृ. २९), "ग्रुप" (पृ. २९), "पोजीशन" (पृ. ३०), "सस्पेंड" (पृ. ४३), "प्रॉडक्शन" (पृ. ४७).

वाहतूकीच्या साधनांची सोय झाल्यामुळे शहर आणि खेडे याच्यांतील अंतर कमी झाले आहेत त्यामुळे शहरातील इंग्रजी भाषेचा प्रभाव ग्रामीण भागातील भाषेवर झालेला आढळतो.

**'धुराळा' मधील भाषाशैली**

पुढील घटकांच्या आधारे 'धुराळा' या कादंबरीच्या भाषाशैलीचा अभ्यास करणे उचित ठरते.

**'धुराळा' मधील निवेदनाची भाषा**

'धुराळा' या कादंबरीतील निवेदनाची भाषा ही प्रमाणभाषा व ग्रामीण बोलीभाषा यांच्या मिश्रणातून साकार झाली आहे. 'धुराळा' या कादंबरीत विशेषत: लातूर व सोलापूरच्या सिमारेषेवर बोलल्या जाणाऱ्या बोलीभाषेचा वापर करून निवेदनाची मांडणी केली आहे.

'धुराळा' या कादंबरीतील निवेदन पाहूया:

उदा.- ''सकाळच्या भाग्यानं सगळयांना जाग आली. आरबळून जो तो आवाज आलेल्या दिशेला बघतोय.'' (पृ. ५३)

''पहिला आठवडा असा नव्या जोमाचा अन् भरारीचा गेला, चार एकरांचा फड त्यांनी हा हा म्हणता पार केला.''(पृ. ६३)

''सुदामा शेमल्याचा तुरा उडवीत आपूट पाय टाकीत निघाला.''(पृ. ६९)

**संवादाची भाषा**

योगीराज वाघमारे यांनी 'धुराळा' या कादंबरीत सुदामा या ऊसतोडणी कामगाराची कर्मकहाणी मांडली आहे. या कादंबरीला ग्रामीण बोलीचा गंध आहे. अशा ग्रामीण बोलीचा वापर संवादासाठी केला आहे. त्यामुळे ही कादंबरी अधिक महत्वपूर्ण, वाचनीय ठरते. या कादंबरीत संवादामुळे व्यक्तीरेखा अधिक स्पष्ट होतात. त्याच्या भाव-भावनाचे यथायोग्य दर्शन घडते. तसेच पात्रांची स्वभाववैशिष्ट्ये प्रकट होतात. त्यामुळे कादंबरी ही सर्वांगाने फुलत जाते. 'धुराळा' या कादंबरीतील संवादाची भाषा ही लातूर व सोलापूर यांच्या सिमारेषेवर बोलली जाणारी बोली भाषा याचा वापर करून निर्माण केली आहे.

'धुराळा ' या कादंबरीतील काही संवाद पाहूया.

**सुदामा व हॉटेल मालक यांच्यामधील संवाद**

हॉटेल शिवशंकर मध्ये काम करण्यासाठी आलेला सुदामा व हॉटेल मालक यांचा संवादातून सुदामाची अगतिकता निदर्शनास येते. सुदामाला हॉटेल मालक विचारतो.

'' कोणत्या गावाचा?''

''रूईचा.''

आता मात्र त्यानं गावाच नाव विचार करून सांगितलं.

“काय शेतपोत?”

“कायबी नाय.”

“असं कसं बरं?”

“खरं तेच सांगतोय.”

“मग कुणाचा हाईस?”

त्यांन मान खाली घातली.

“बरं पगार किती घेशील?”

“मालक, तूम्ही कायबी दया, पोटाला दोन वेळा खायला दिलं तरी पुरं झालं!” (पृ. १२)

**वाडीचे मजूर व चिच्या यांच्यामधील संवाद**

ऊसतोडणी कामासाठी आलेल्या वाडीच्या मजूराची चौकशी करण्यासाठी चिच्या विचारतो. चिच्याच्या मुसलमानी व मराठी मिश्र संवाद महत्वपूर्ण वाटतो.

“ मला समजत नाय, एवढया लांब यायची काय गरज व्हती?”

“अं”

“हा, मै तो वहीच बोलता हूँ तुमारी खेती है ना?”

“ तर”

“ किती?”

“ तेरा ऐकर.”

“हयाला पंधरा एकर.”

“अन् हयांना दहा एकर.”

“देखो इतना खेती है तो बी इधर आये?”

अशा या संवादातून चिचाच्या चौकस बुध्दीचे दर्शन या संवादातून घडते.

योगीराज वाघमारे यांनी धुराळा या कादंबरीचा प्रवाहीपणा कायम राखून गती देण्याचे काम या संवादाच्या माध्यमातून सहजपणे साधले आहे. धुराळा या कादंबरीत संवादातून प्रसंग, त्यातील व्यक्तीरेखा, त्यांचे स्वभाव सारे काही नजरेसमोर उभे राहते. त्यामुळे कादंबरी ही अधिक वास्तव वाटते.

**दर्शनात्मक पध्दती**

'धुराळा' या कादंबरीत लेखकानी प्रसंग असो किंवा निवेदन यातून घडणारे ग्रामीण जीवनाचे दर्शन वाचकासमोर प्रत्यक्ष उभे केले आहे. तसेच 'धुराळा' या कादंबरीत येणारे फॅक्टरीचे दर्शन, तेथील परिसर, तेथील ऊसतोड कामगाराची अवस्था यांचे हुबेहूब दर्शन करून ते वाचकाला कादंबरीविश्वात नेऊन सोडतात. याचे श्रेय त्यांच्या लेखनशैलीला दयावे लागेल. 'धुराळा' या कादंबरीत येणाऱ्या प्रत्यक्ष दर्शनातून फॅक्टरीचा परिसर जीवंत केला आहे.

उदा.- हॉटेलमधून सगळा परिसर दिसत होता. उसाच्या शंभर-दीडशे बैलगाडया आणि तेवढयाच मालट्रक्स लाईनीत उभ्या होत्या. खालच्या बाजूला मजुरांच्या असंख्य झोपडया अन् डाव्या हाताला बंगलेच बंगले, समोर बागा होत्या तर हमरस्त्यावरून मोटारी, जिप्स, फटफटया धुराळा उडवित जायच्या. (पृ. ५८)

ऊस भरून झाला की कारखान्याकड गाडया निघायच्या , गाडयांची तोंड उगवतीकडं असायची. सगळं ऊन डोक्यावर असायचं कामानं दमून गेलेलं माणूस उन्हाच्या चपकाऱ्यानं हैराण व्हायचं.(पृ. ७३)

**वर्णनात्मक पध्दती**

योगीराज वाघमारे यांनी 'धुराळा' या कादंबरीत वर्णनातून त्यांनी ग्रामीण भाग नजरेसमोर उभा केला आहे. तसेच 'धुराळा' या कादंबरीतील व्यक्तिरेखा यांची वर्णन खूप महत्वपूर्ण वाटतात. अनेक बारकाव्यासह व्यक्तिरेखाचे दर्शन घडते. 'धुराळा' या कादंबरीत त्रिंबकरावाचे व्यक्तिमत्त्व वर्णनातून वाचकासमोर उभे राहते. "दाढीच खुंट

वाढलेली, उलटे केस पाडलेले. चपचप तेल लावलेलं. हाताच कडं असलेलं, पट्ट्यापट्ट्याचा अर्ध्या बाहयाचा बुशशर्ट निळया रंगाची पँट , छातीवरती बटनं रिकामी, त्यातून छाती दिसतेय. काळया केसांचं दाट जंगल." (पृ. ४०).

तसेच देवाच्या वाडीचे वर्णन सुध्दा कादंबरीत ग्रामीण भागाचे दर्शन घडविते.

"देवाची वाडी तशी आडवळणाचीच आहे. तुकाईच्या माळाला मागे सारून दगडगोटयांच्या वाटेत दोन चार वळण ओलांडली की आपण देवाच्या वाडीत येतो. हजार दिड वस्ती, घरंच अशी आहेत की इथं दोन चार तर तिथ चार पाच ना विटाची ना दगडांची एकावर एक दगडगोटा ठेवायचा. शेणमातीचा लेप दयायचा." (पृ.२३).

योगीराज वाघमारे यांनी अशा बारीक सारीक वर्णनातून कादंबरीला समृध्द केले आहे.

**निवेदनात साद-शब्दाचा वापर**

'धुराळा ' या कादंबरीत ग्रामीण भागातील वापरण्यात येणाऱ्या साद-शब्दाचा वापर केल्यामुळे तेथील पात्रांची कृती, वागणे, घटना ठळकपणे जाणवतात. ग्रामीण बोलीतील साद-शब्दामुळे कादंबरीला एक अनोखे सौंदर्य प्राप्त झाले आहे.

उदा. "पत्र बित्र" (पृ. १८), "दुखत-खुपत"(पृ. १९), "काही - बाही" (पृ.२१),

"कवा बवा"(पृ. २५), "चुकला माकला" (पृ. २५), "उन्हातान्हात" (पृ. २९), "म्हातारी-कोतारी" (पृ. ३३), "शेजारी-पाजारी" (पृ. ४६), "पोरंटोरं", "पीठकूट" (पृ. ४९), "भांडणबिंडन" (पृ. ५०).

**निवेदनात म्हणी व वाक्यप्रचाराचा वापर**

ग्रामीण बोलीत अनेकवेळा म्हणींचा अन् वाक्यप्रचाराचा वापर केला जातो. योगीराज वाघमारे यांना ही बोली परिचित असल्याने त्यांनी आपल्या लेखनशैलीत म्हणींचा अन् वाक्यप्रचाराचा सातत्याने वापर केला आहे.

**म्हणी**

उदा. ''चोख काम रोख दाम'' (पृ. ४४),

''मांजरान डोळ झाकून दूध पिल म्हंजी जगाला दिसत नाय असं तिला वाटतंय पण जगालांबी डोळ असत्येय.''(पृ. ३७)

''जसे आले तसे कोरडया हातानेच गेले.''

**वाक्यप्रचार**

उदा. ''सुदाम्यांच घोडं गंगेत न्हायाचं''(पृ. १६)

''सायबानाही क्षणभर गलबलून आलं.''(पृ. २२)

''घरावरून नांगर फिरविला.''(पृ. ५४)

''इच्यारी की पाच्यारी ''(पृ. ६२)

''मजूरांच्या जखमेवर मीठ चोळल्यासारखं झाल'' (पृ. ८१) इ.

अशा या म्हणी व वाक्यप्रचारामुळे 'धुराळा' या कादंबरीला जीवंतपणा आला आहे. खास ग्रामीण म्हणून ज्याचा उल्लेख करता येईल असे हे म्हणी व वाक्यप्रचार आहेत.

**शिव्याचा वापर**

योगीराज वाघमारे यांनी 'धुराळा' या कादंबरीत ग्रामीण भाषेतील अस्सल शिव्याचांही प्रसंगी वापर केला आहे. त्यात कुठेच तडजोड केली नाही. अन् त्यामुळेच त्यांच्या कादंबरीला जीवंतपणा लाभला आहे.

उदा. '' भडव्या इतकाली भाजी दिल्यावर माझं दिवाळ काढतोस व्हय?'' (पृ. १६)

''असेल रंडीबाज, दारूबाज दुसर काय?'' (पृ. १८)

''थोत् त्याच्या आयला'' (पृ. ३४)

'' त्याच्या मायला कुणाचं बी ऐकून बोंबलतीय! '' (पृ. ३७)

''अराराऽ चांडाळ, मुक्या जिवाला एवढं उपासी मारीत असत्येत व्हयं?'' (पृ.५५)

"गार भरली, मुडदा पिलीगाचा गड्डुला उठला त्याला." (पृ. ७७) इ.

लेखकांनी या शिव्याचा वापर करून 'धुराळा ही कादंबरी अभिव्यक्तीदृष्टया समृध्द बनविली आहे.

**प्रतिमाचा वापर**

योगीराज वाघमारे यांच्या 'धुराळा' या कादंबरीतील प्रतिमासुष्टीही मनोवेधक अन् परिणामकारक आहे. व्यवहारी भाषेतील शब्द आणि त्यांचे अर्थ वापरून खूपच गुळगुळीत झालेले असतात. त्यासाठी लेखकाच्या नवनिर्मितीत प्रतिमाची सृष्टीच अवतरत असते. या प्रतिमामुळे रूढ वाच्यार्थ थोडा बाजूला ठेवून शब्दार्थात ताजेपणा आणि टवटवीतपणा आणला जातो. योगीराज वाघमारे यांच्या 'धुराळा' या कादंबरीत प्रतिभापूर्ण वाक्यामुळे कादंबरी वाचनीय बनली आहे.

उदा. " गिऱ्हाईकाच्या चेहऱ्यावर बावळटपणाचा हाव होता." (पृ. १८)

"तो मुक्यासारखा गप्प होता." (पृ. २०)

"तो हिरमुसल्या तोंडाने बोलू लागला." (पृ. २१, २२)

"शाळेच पत्र उठाबशा काढतात." (पृ. २४)

"अवं उठा दिस कासराभर वर आलाय." (पृ. २८)

यासारख्या प्रतिमा या कादंबरीत आढळतात. त्यामुळे कादंबरीला एकप्रकारचा जीवतंपणा लाभतो.

**उपमाचा वापर**

शहरी लोकापेक्षा ग्रामीण भागातील लोक नेहमीच उपमांचा वापर जास्त करताना दिसतात. त्यांचे बोलणे सरळ कधी नसतेच यांचा बारकाईने अभ्यास करून योगीराज वाघमारे यांनी आपल्या लेखनशैलीला परिणामकारक उपमांची जोड दिली आहे.

उदा. “दोघेही बाद झाल्या मृदंगासारखे वाजत होते.” (पृ. ४६)

“कारखाना म्हणजे पैसे मिळण्याचे ठिकाण.” (पृ. ५९)

“ऊस असा ढगाला भिडलेला मनगटाएवढं कांडं.” (पृ. ६०)

“राक्षसासारखा कामाला जुंपलेला होता.” (पृ. ६५, ६६)

“कावळया सारखी झोप असायची.” (पृ. ७६)

“का उगंच गाढवासारखं हसायला लागला?” (पृ. १८)

“बाकी दरवाजा आणि खिडक्या नसलेली इमारत म्हणजे कोंडवाडा.”(पृ. २४)

“अशा उपमानांनी भरलेल्या लेखनामुळेच कादंबरीची परिणामकारकता वाढली आहे.”

अशाप्रकारे पात्राच्या तोंडी या शिव्याचा वापर सहजपणे आलेला दिसतो.

**ध्वनिदर्शक शब्दाचा वापर**

“धुराळा या कांदबरीत ध्वनिदर्शक शब्दाचा वापर करून कादंबरीच्या कथानकाला अर्थपूर्णता प्राप्त झाली आहे” (पृ. १४)

“स्टोव्ह पेटंला. फर्रर्र आवाज करू लागला.” (पृ. २१.)

“जांभळीला होला टोकटोक करीत असतो!”(पृ. २६)

“नांगराच्या चाकाचा ‘चुरू...चुरू चुक’ आवाज”(पृ. ३३)

“पोरग नाकात गूं गूं करायचं” (पृ. ३४)

“पण त्यांच्या पाठीवर मात्र सारखा चाबूक खुळखुळ वाजतोय.” (पृ. ९९) इ.

वरील अधोरेखित केलेल्या ध्वनिदर्शक शब्दरचनेमुळे कादंबरीला सौदर्य प्राप्त झाले आहे. कादंबरीला अर्थपूर्णता आणण्यासाठी वापरल्या गेलेल्या ध्वनिदर्शक शब्दामुळे कादंबरीला नेमकेपणा प्राप्त झाला आहे.

**ग्रामीण बोलीतील शब्दाचा यथायोग्य वापर**

‘धुराळा’ ची कादंबरीत ग्रामीण परिसराचे दर्शन घडते. ग्रामीण भागातच ही कादंबरी जन्मली आहे. त्यामुळे या परिसरातील भाषेच्या शब्दाचा योगीराज वाघमारे

यांनी नेमकेपणाने वापर केला आहे. त्यामुळे कादंबरी जीवंत व परिणामकारक ठरते. 'धुराळा' या कादंबरीत येणारे काही ग्रामीण शब्द पाहूया. उदा. 'कामाठी' (पृ. १२), 'काटूक' (पृ, १३), 'तकीम' (पृ, २३), 'मायंदळ' (पृ. २३), 'शिवार' (पृ. २५), 'थाळी' (पृ. २७), 'कलागत' (पृ. ३३), 'खेकाना' (पृ. ३४), 'खुरदळा' (पृ. ४३), 'बक्कळ' (पृ. ४४), 'जित्राब' (पृ. ६३) इ.अशा ग्रामीण बोलीतील शब्दाचा वापर योगीराज वाघमारे यांनी 'धुराळा' या कादंबरीत केला आहे.

**शेतीशी निगडीत शब्दाचा वापर**

'धुराळा' या कादंबरीतील नायक हा शेतकरी आहे. त्यामुळे त्यांच्याअनुषंगाने कादंबरीत कृषीजीवनातील अनेक शब्द आले आहेत. उदा. 'मोगडा' (पृ. २५), 'कुंदळ' (पृ. २५), 'बांध' (पृ. २६), 'ढेकूळ' (पृ. २६), 'दसकट' (पृ. २६), 'विहिर' (पृ. २६), 'पवळी' (पृ. २७), 'नांगरट' (पृ. २९), 'पाळी' (पृ. २८), 'सड' (पृ. २८), 'सड', 'कुंदा', 'दरडी', 'गंजी', 'कुंपट्या', 'फाळ', 'कुळव' (पृ. ३३) इत्यादी शेतीशी निगडीत शब्दाचा वापर लेखकानी सर्मपक अशा पद्धतीने कादंबरीत केला आहे.

**इंग्रजी शब्दाचा वापर**

ग्रामीण भागावरती इंग्रजी भाषेचा खूप प्रभाव पडलेला आहे. मराठी माणूस बोलताना सहजपणे इंग्रजी शब्दाचा वापर करीत असतो. अशा मराठी भाषेमध्ये रूढ झालेल्या इंग्रजी शब्दांचा उल्लेख 'धुराळा' या कादंबरीत येतो.

'कंटिग सलून' (पृ. १२), 'पॅसेंजर' (पृ. १४), 'कंडक्टर', 'ड्रायव्हर' (पृ. १७), 'लेट' (पृ. १७), 'स्पेशल' (पृ. २०), 'ऑफिस' (पृ. ३५), 'इलेक्शन' (पृ.३७), 'मेंबर' (पृ. ३८), 'नाईट' (पृ. ४१), 'फॅक्टरी' (पृ. ५३), 'इस्टेट' (पृ.५४), 'लेबर' (पृ. ५६), 'डायरेक्टर' (पृ. ६०) इ. इंग्रजी शब्द 'धुराळा' मध्ये निवेदनाच्या व संवादाच्या माध्यमातून कादंबरीत येतात.

योगीराज वाघमारे यांच्या 'पडझड' व 'धुराळा' या कादंबरीच्या भाषाशैलीचा अभ्यास अनेक घटकाद्वारे प्रस्तुत प्रकरणात केला.

प्रस्तुत प्रकरणात 'पडझड' व 'धुराळा' या कादंबरीच्या वाङ्मयीन अभिव्यक्तीचा व्यक्तिचित्रणे, प्रसंगनिर्मिती, वातावरणनिर्मिती, निवेदनपद्धती व भाषाशैली या घटकाद्वारे अभ्यास केला आहे.

# संदर्भ सूची


| | | | |
|---|---|---|---|
| १. | हस्तक उषा | : | ‘कादंबरी आणि मराठी कादंबरी’, साहित्यसेवा प्रकाशन, औरंगाबाद, १९९३, पृ. २८. |
| २. | बापट व गोडबोले | : | ‘मराठी कादंबरी-तंत्र व विकास’, व्हिनस प्रकाशन, पुणे, १९७३, तृ. आ., पृ. १३७. |
| ३. | नेमाडे भालचंद्र | : | ‘साहित्याची भाषा’, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९८७, प्र. आ., पृ. ३०. |
| ४. | संत जान्हवी | : | ‘कादंबरी-एक वाङ्मय प्रकार’, मोघे प्रकाशन, कोल्हापूर, १९७१, प्र. आ., पृ. ९०. |
| ५. | नेमाडे भालचंद्र | : | ‘साहित्याची भाषा’, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९८७, प्र. आ., पृ. ३०. |
| ६. | वाघमारे योगीराज | : | ‘पडझड’, हर्ष प्रकाशन, कोल्हापूर, २००५. |
| ७. | वाघमारे योगीराज | : | ‘धुराळा’, हर्ष प्रकाशन, कोल्हापूर, २००५. |